संस्कृत भाषांतरासाठी काही AI tools उपलब्ध आहेत. ज्यात Google Translate, QuillBot, **Voila, Merlin AI, OpenL, DakshGPT,** Sanskrit India Typing, Sanskrit translation आणि काही Apps येतात. यापैकी प्रस्तुत शोधपत्रात Google Translate आणि QuillBot यांच्या द्वारे मराठी भाषेतील मजकूर संस्कृत भाषेत भाषांतरित करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी भाषेचा मजकूर हा “राधायनम्” या महाकाव्यातील काही श्लोकांचा अर्थ घेतलेला आहे. यात सरल, मध्यम आणि कठीण या तीन स्तराचे उदाहरण घेतले आहे.

उदाहरण १)

मराठी - आता संध्याकाळ झालेली आहे. तेव्हा मी आता गोकुळात जाते. [1]

संस्कृत –

Google Translate - अधुना सायंकालः अस्ति । अतः इदानीं गोकुलं गच्छामि ।

QuillBot - इदानीं सायंकालः अस्ति। इदानीं अहं गोकु-नगरं गच्छामि ।

उदाहरण २)

मराठी – मेघरहित आकाशात एकदा एक मेघ दिसला. त्यावेळी ते आकाश एखाद्या गजेंद्राप्रमाणे शोभू लागले. हा मेघ म्हणजे त्या गजेंद्राचे जणू काय गंडस्थलच आहे.[2]

संस्कृत –

Google Translate - एकदा मेघः निर्मेघे आकाशे आविर्भूतः । तदाकाशं गजेन्द्र इव अलङ्कृतम् अभवत् । तस्य गजेन्द्रस्य गण्डस्थल इव मेघः।

QuillBot - एकदा आकाशे मेघः आसीत्। तस्मिन् समये आकाशः इन्द्रधनुः इव दृश्यते स्म। अयं मेघः विश्वस्य केन्द्रम् इव अस्ति ।

[1] राधायनम् ६/१७ मराठी अनुवाद

[2] राधायनम् ६/३३ मराठी अनुवाद

उदाहरण ३)

मराठी - थंडगार वायूने हे निकुंज आनंदित झाले. आणि चंद्राच्या किरणांनी विकसित केलेल्या कमळाच्या गंधाला ह्या निकुंजाने धारण केले. त्यावेळी संपूर्ण भुवन सुवर्णमय तथा रत्नजडीत झाले होते. यावरून विशुद्धसुवर्णमय असणारे हेमंत ऋतूचे तेज स्वतःहून प्रकट झालेले होते. [3]

संस्कृत –

Google Translate - अयं उद्यानः शीतलवायुना आनन्दितः आसीत् । अयं च निकुञ्जः चन्द्रकिरणैः विकसितं कमलस्य गन्धं अवशोषयति स्म। तदा सर्व्वं जगत् सुवर्णमणिभूषितम् । अत एव शरदऋतुस्य शुद्धा काञ्चनकान्तिः स्वयमेव प्रकाशिता ।

QuillBot - शीतलवायुः आनन्ददायकः आसीत्। तथा च चन्द्रकिरणैः उत्पद्यमानः कमलस्य गन्धः अस्मिन् निकुञ्जया ग्रहीतः। तस्मिन् समये सम्पूर्णे पृथिव्या सुवर्णैः रत्नैः च आच्छादिता आसीत्। एतेन हेमन्त-ऋतुकालस्य शुद्धः सुवर्णप्रकाशः प्रकटः अभवत् ।

या तीन ही स्तरांचे भाषांतर करत असताना असे लक्षात येते की, सरल वाक्ये google translate अन्य कोणत्याही app च्या तुलनेत अधिक अचुकतेने भाषांतरित करू शकतो. मध्यम आणि कठीण स्तराच्या उदाहरणावरून असे दिसून येते की, या स्तरांच्या उदाहरणातील जो सरल अंश आहे तो योग्यतेने भाषांतरित करतो परंतु काही भाषेतील तांत्रिक शब्द अथवा सामासिक शब्द योग्यप्रकारे भाषांतरित होत नाही. तसेच व्याकरण त्रुटी ही दिसून येते.

संस्कृत भाषांतर साधनांचे फायदे, अडचणी, आव्हाने आणि अचूकता

१)फायदे

१.१. सुलभता - संस्कृत भाषांतर साधनांमुळे प्राचीन भाषा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचू शकते ज्यात विद्यार्थी, शोधकर्ते आणि संस्कृत प्रेमींचा समावेश आहे.

१.२. डिजिटल जतन - डिजिटलाइज्ड संस्कृत शब्दकोश आणि text corpora सारखी साधने प्राचीन हस्तलिखिते जतन करण्यास आणि शोधकार्य अधिक सुलभ बनविण्यास मदत करतात.

१.३. संशोधन सहाय्य - शोधकर्त्यांना संस्कृत ग्रंथांमधील शब्द, वाक्ये आणि अर्थ त्वरित ओळखण्यासाठी ही साधने उपयुक्त आहेत आणि प्रत्यक्षात शोधण्यासाठी लागणारा वेळ वाचवणारी आहे.

---

[3] राधायानम् ६/२८ मराठी अनुवाद

२) अडचणी

२.१. संदर्भ संवेदनशीलतेचा अभाव - अनेक भाषांतर साधने संस्कृत शब्द, वाक्प्रचार किंवा वाक्याचा संदर्भ समजून घेण्यात सक्षम नाही. ही भाषांतर साधने शब्दशः भाषांतरे देऊ शकतात जी अर्थ अचूकपणे समजण्यात अयशस्वी होतात.

२.२. चुकीचे भाषांतर – प्रस्तुत केलेला मजकूर AI द्वारे न समजल्यामुळे अनेक साधने अशी भाषांतरे प्रदान करतात जी संस्कृतचे योग्य तात्त्विक किंवा काव्यात्मक सार प्रतिबिंबित करू शकत नाहीत.

२.३. तंत्रज्ञानावर अति अवलंबून राहणे - वापरकर्ते भाषांतर साधनांवर अति अवलंबून राहू शकतात, ज्यामुळे भाषा शिकण्यात कमी प्रयत्न होतात. यामुळे संस्कृतचे सखोल आकलन होण्याऐवजी उथळ समज निर्माण होऊ शकतो.

३) आव्हाने

३.१. एकाच शब्दाचे अनेक अर्थ – अनेकदा एकाच संस्कृत शब्दाचे अनेक अर्थ असतात त्यांच्या प्रयोगावर आधारित अनेक अर्थ असू शकतात. उदा. लवणम् आनय इति।

३.२. व्याकरणाची जटिलता – संस्कृत भाषेत एकच शब्द संख्या, लिंग आणि कालानुसार अनेक वेगवेगळ्या स्वरूपात येऊ शकतो. व्याकरणाची शुद्धता टिकवून ठेवण्यासाठी ही जटिलता भाषांतर साधनांसाठी एक आव्हान निर्माण करते.

३.३. संधी – संस्कृत भाषेत संधी चा प्रयोग केल्या जातो. जी या साधनांना अनेकदा संध्यात्मक शब्द अचूकपणे वेगळे करण्यात अडचण येते ज्यामुळे चुकीचे किंवा अपूर्ण भाषांतर होते.

४) अचूकता (Accuracy)

४.१. मूल भाषांतर अचूकता - सोप्या भाषांतरांसाठी Google Translate सारखी अनेक साधने काही प्रमाणात अचूक परिणाम देतात. ते शब्द किंवा साधे वाक्ये अचूकतेसह भाषांतरित करू शकतात.

४.२. काव्यात्मक आणि तात्विक अचूकता - संस्कृत काव्य, रूपके किंवा धार्मिक संदर्भांचा योग्य अर्थ अचूकपणे मांडण्यात भाषांतर साधने अपयशी ठरतात.

४.३. व्याकरण आणि वाक्यरचनांमध्ये त्रुटी - काही भाषांतर साधने मूलभूत व्याकरणासह (विशेषतः आधुनिक रूपे) चांगली कामगिरी करतात, परंतु संस्कृतमधील क्रियापद आणि शब्द भाषांतरित करताना ते अनेकदा चुकीचे व्याकरण किंवा विचित्र रचना निर्माण करतात.

निष्कर्ष

संस्कृत भाषांतर साधने ही नवशिक्यांसाठी, विद्वानांसाठी आणि सामान्य शिकणाऱ्यांसाठी एक मौल्यवान संसाधने असली तरी त्यांना अजूनही अचूकतेमध्ये अनेक मर्यादा येतात, विशेषतः संस्कृत व्याकरण, संदर्भ आणि तात्त्विक किंवा साहित्यिक ग्रंथांच्या संदर्भात योग्य वाक्यरचना प्राप्त होत नाही. योग्य आणि अचूक भाषांतर होण्याकरिता विद्वानांचे विशेष योगदान आवश्यक आहे. त्यामुळे AI विकसित होत असताना आपल्याला संस्कृत भाषांतर साधनांच्या अचूकतेत आणि उपयुक्ततेमध्ये हळूहळू सुधारणा दिसू शकतात. संस्कृत भाषेचे भाषांतर करण्याचे आव्हान त्याच्या कठीण व्याकरणात आहे तसेच एकाच शब्दाचे त्याच्या प्रयोगावर आधारित अनेक अर्थ असू शकतात. म्हणूनच प्रभावी संस्कृत भाषांतरासाठी केवळ भाषिक कौशल्यच नाही तर सांस्कृतिक, साहित्यिक आणि तात्त्विक ज्ञान देखील आवश्यक आहे. संस्कृत भाषांतराचे योग्य कार्य करायचे असल्यास विशेषतः प्राचीन किंवा साहित्यिक ग्रंथांवर किंवा प्रौढ संस्कृत अपेक्षित असल्यास, व्याकरण आणि संदर्भाची सखोल समज असणे आणि याचे संपूर्णपणे अवलोकन प्रत्यक्षात करणे आवश्यक आहे. ही प्रस्तुत भाषांतर साधने नवशिक्यांसाठी किंवा सोपे मजकूर भाषांतरित करण्याकरिता उपयुक्त आहेत.

संदर्भग्रंथसूची

१) **“Use of Sanskrit for natural language processing”**, Chandana Bathulapalli, Drumil Desai and Manasi Kanhere, ISSN: 2394-7519, International Journal for Sasnkrit Research (अनन्ता)

२) **“A Pragmatic Analysis of Machine Translation Techniques for Preserving the Authenticity of the Sanskrit Language”**, Nandini Sethi, Amita Dev, Poonam Bansal, Deepak Kumar Sharma, Deepak Gupta, ACM Trans. Asian Low-Resour. Lang. Inf. Process, http://dx.doi.org/10.1145/3610582

३) **“English to Sanskrit Translator and Synthesizer”**, Sarita G. Rathod1, Shanta Sondur, ISSN 2250-2459, International Journal of Emerging Technology and Advanced Engineering

४) **“Study of Various Approaches in Machine Translation for Sanskrit Language”**, Prof. Deepak Mane, Aniket Hirve, ISSN 2278-7763, International Journal of Advancements in Research & Technology, Volume 2, Issue4, April-2013

५) **“General Structure of Ssnskrit Machine Translation System”**, K.S. Glida, S.S. Dixit, S.V. Narote, ISSN-2349-5162, Journal of Emerging Technologies and Innovative Research (JETIR)

६) Google Translate- https://translate.google.co.in/?sl=mr&tl=sa&op=translate

७) QuillBot - https://quillbot.com/translate?sl=mr&tl=sa

***

संस्कृत भाषांतरातील तंत्रज्ञान संधी आणि मर्यादा याचा चिकित्सक अभ्यास

रघुवीर रवींद्र रामदासी
शोधछात्र, संस्कृत भाषा साहित्य विभाग,
क.का.सं.वि. रामटेक, महाराष्ट्र

प्रो. पराग जोशी
मार्गदर्शक, संस्कृत भाषा साहित्य विभाग,
क.का.सं.वि. रामटेक, महाराष्ट्र

सारांश:-

संस्कृत भाषा ही विश्वातील प्राचीन भाषा म्हणून समजली जाते. या भाषेमध्ये विपुल असा ज्ञानसाठा आहे. विविध विषयांच्या अनुषगाने सूक्ष्म असे चिंतन या भाषेतून करण्यात आलेले आहे. संस्कृत भाषेतील असे अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यांचा अनुवाद करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जगातील वेगवेगळ्या भाषामध्ये त्यांचे भाषांतर करण्यासाठी प्रयत्न आहे. परंतु सस्कृत भाषेचे अन्य भाषांमध्ये भाषांतर करत असताना काही उपयोगिता आहेत. तशाच बऱ्याचशा मर्यादा देखील दिसून येतात याचाच चिकित्सात्मक अभ्यास या शोधपत्रातून केलेला आहे.

संकेतशब्द - संस्कृत, भाषातर, तंत्रज्ञान, संधी, मर्यादा, चिकित्सा

उद्देश - संस्कृत भाषेतील ग्रंथ विविध भाषांमध्ये भाषांतरित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग आणि त्यातील मर्यादा यांचा शोध घेणे.

संशोधन पद्धती - या शोधपत्रासाठी चिकित्सात्मक अध्ययन पद्धतीचा अवलंब केला आहे.

प्रस्तावना -

व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्।

या वचनानुसार संस्कृत भाषेमध्ये सर्व विषयांचे व सर्व घटकांचे सविस्तर चिंतन करून शास्त्रशुद्ध मांडणी करण्यात आलेली आहे. वैदिक कालखंडापासून आधुनिक कालखंडापर्यंत संस्कृत

भाषेतून विविध विषयांच्या अनुषंगाने अनेक विद्वानांनी असंख्य ग्रंथांची निर्मिती केलेली आहे. वैदिक संस्कृत व अभिजात संस्कृत अशा दोन भागांमध्ये याचा विचार आपल्याला करता येईल. प्रत्येक ग्रंथाची रचना ही अत्यंत शास्त्रशुद्ध व सखोल तसेच प्रमाणित अशी करण्यात आलेली आहे. त्यामुळे मानवी जीवनातील विविध विषयांच्या अनुषंगाने विशेषतः शास्त्रीय संशोधनाच्या अनुषंगाने संस्कृत भाषेतील ग्रंथांचे महत्त्व आहे. आज वैश्विक स्तरावर विविध विषयांच्या अनुषंगाने शोध घेत असताना अशा मूल संशोधित भागाचा अभ्यास अगत्याचा ठरतो. अशावेळी केवळ संस्कृत भाषेचे ज्ञान नसल्याने त्या भाषेतील अत्यंत शास्त्रशुद्ध असा ज्ञानसाठा मिळविण्यास अडचणी येतात. यासाठी तंत्रज्ञानाच्या माध्यमाने संस्कृत ग्रंथांमधील आशयाचे विविध भाषांमध्ये भाषांतर करणे औचित्यपूर्ण व पुढील संशोधनास आधारभूत ठरते. संस्कृत मधील या शास्त्रशुद्ध लेखनाचा उपयोग विविध भाषेतील विविध विषयांच्या निष्कर्षाप्रत पोहोचण्यास अत्यंत उपयोग होतो. तसेच तंत्रज्ञानाच्या माध्यमाने एखादा घटक अत्यंत सुलभ पद्धतीने प्राप्त करणे व वेगवान पद्धतीने असे संपादन करणे शक्य होते. आज वैश्विकस्तरावर संस्कृत भाषेविषयीची ओढ पाहता व त्यातील ज्ञानसाठा याबद्दल अभ्यासक, संशोधक यांची जिज्ञासा पाहता तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भाषांतर याची आवश्यकता प्राबल्याने वाढलेली दिसते. यानुसार संस्कृत भाषांतरातील तंत्रज्ञान यातील संधी आणि मर्यादा यांचा चिकित्सात्मक अभ्यास या शोधपत्रात केलेला आहे.

1. भाषांतराचे स्वरूप -

भाषांतर ही अर्थ आणि माहिती यांची निर्मिती प्रक्रिया आहे. जी मूल स्रोत भाषेतून अन्य अपेक्षित भाषेमध्ये भाषाशास्त्रीय व सांस्कृतिक संदर्भासह केले जाते. भाषांतरातील संधींचा विचार करता याला खूप चांगले भविष्य आहे. कारण संस्कृत भाषेच्या संदर्भाने आज जागतिक स्तरावर अनेक अभ्यासकांत उत्सुकता आहे. शिवाय प्रतिभावान लोकांना काम करण्यासाठी हे एक वेगळे क्षेत्र नेहमी खुणावत राहते. आज अनेक लोक एक वा अधिक भाषा स्पष्टपणे जाणत असतील तर ते भाषांतरकार बनू शकतात. संबंधित विषयाचे ज्ञान, सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ यांची उत्तम जाण असणारे अभ्यासक द्विभाषिक भाषांतरकार म्हणून उत्तम कार्य करू शकतात. वासुदेव चक्रवर्ती म्हणतात की एक चांगले भाषांतर त्या भाषेतील नवनिर्मिती, विषयाचा प्रवास, भाषाशास्त्रीय साचेबद्ध कार्य अन्य भाषेत जशास तसे उतरवताना दिसून येते. भाषांतर हे दोन प्रकारे होताना दिसून येते. एक म्हणजे संबंधित तज्ञ भाषांतरकार व व दुसरे यांत्रिक पद्धतीने. तज्ञ भाषांतरकार भाषेच्या अनुरूप अर्थात अर्थ व भाव यांच्या सहसंदर्भात विचार करून भाषाशास्त्रीय दष्या त्याचे अचक व अपेक्षित भाषांतर करताना दिसन येते या बाबी तंत्रज्ञानाच्या स्तरावर विचार करता काही मर्यादा निश्चितच येतात.

2. संस्कृत अनुवादात तंत्रज्ञानाची भूमिका –

संस्कृत भाषेतील आशयाचे अन्य भाषेमध्ये भाषांतर करत असताना आज तंत्रज्ञानाची उपलब्धता आहे. यातून अनेक संस्कृत ग्रंथांचे अन्य कोणत्याही भाषांमध्ये भाषांतरण सुलभ झालेले आहे. संस्कृत भाषेत असंख्य ग्रंथ निर्मिती परिणामी खूप मोठा ज्ञानाचा स्त्रोत उपलब्ध आहे. परंतु भाषिक अवगमन नसल्याने याचा लाभ विविध अभ्यासकांना विविध संशोधनांमध्ये होऊ शकत नाही. परिणामी तंत्रज्ञानाच्या साह्याने अशा संदर्भग्रंथांचे भाषांतर अपेक्षित भाषेमध्ये करणे आज शक्य झाले आहे. यामध्ये तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर तसेच योग्य भाषांतर यासंदर्भात काही उपयुक्तता आहेत, तर काही मर्यादा देखील पाहायला मिळतात. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्राथमिक अवस्थेत संस्कृत भाषेतील अनुवाद करणे सुलभ झालेले दिसून येते. यातून किमान आशय संपादन यासाठी मदत होताना दिसून येते.

3. संस्कृत भाषांतरातील तंत्रज्ञान संधी -

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संस्कृत भाषेतील ग्रंथांचे अथवा विविध पाठांचे अपेक्षित भाषेमध्ये भाषांतर करणे सुलभ झाले आहे. या निमित्ताने भारताच्या प्राचीन ज्ञान स्त्रोतांचा उपयोग आधुनिक ज्ञानप्रवाह याच्याशी जोडणे सुलभ होत आहे. तसेच विना विलंब व गतीने अनुवाद प्रक्रिया हे या तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य प्रामुख्याने दिसून येते.

3.1 यांत्रिक भाषांतर-

यांत्रिक पद्धतीने संस्कृत भाषेतील आशयाचे अन्य भाषांमध्ये भाषांतर करणे आज शक्य झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने गुगल ट्रान्सलेटर,वर्डनेट याचा वापर केला जातो. यामध्ये गुगल ट्रान्सलेटर वापरातून संस्कृत आशयाचे अपेक्षित त्या भाषेमध्ये भाषांतरण शक्य आहे. यांत्रिक पद्धतीने हे भाषांतर अत्यंत कमी वेळेत व गतीने करणे सुलभ झालेले आहे. तसेच एकाच वेळी विविध भाषांमध्ये देखील एकाच आशयाचे भाषांतर करता येत असल्याचे दिसून येते. यामुळे संस्कृत भाषेतील असे अत्यंत वेगाने भाषांतरित करणे सुलभ होत असल्याचे दिसून येते.

3.2 कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर -

संस्कृत भाषेतील आशयाचे भाषांतर करत असताना ए आय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग शक्य झाला आहे. यातून अपेक्षित घटकाचे भाषांतर अन्य कोणत्याही भाषेत करता येते. तसेच संस्कृत भाषेतील घटकावर आधारित अशा प्रश्न निर्मिती, घटक निर्मिती इत्यादी देखील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे शक्य झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे सुसंगतपणे व वेगाने एखादा आशय भाषांतर करणे सुलभ झाले आहे. ए आय प्रणाली संस्कृत शब्दांचे अर्थ तसेच त्यांचे संदर्भ अधिक अचूकपणे समजून घेऊन जास्तीत जास्त अचूक व नेमके भाषांतर करण्याचा प्रयत्न करते.

3.3 नैसर्गिक भाषा प्रक्रिया -

याद्वारे एन. एल. पी. तंत्रज्ञानाचा वापर संस्कृत भाषेतील वाक्यरचना परिच्छेद यांचे अन्य भाषांमध्ये भाषांतर करण्यासाठी केला जातो. यातून संस्कृत भाषेतील व्याकरण दृष्ट्या विश्लेषण करून अधिकाधिक स्पष्ट व योग्य भाषांतर साधण्याची सुलभता आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संस्कृत भाषेतील शब्द वाक्य परिच्छेद यांचे सहज भाषांतर शक्य आहे असे दिसून येते.

3.4 संगणक साधने -

या माध्यमातून निश्चित असे एप्लीकेशन, वेबसाईट, सॉफ्टवेअर यांच्याद्वारे संस्कृत आशयाचे अपेक्षित भाषांमध्ये भाषांतर करणे शक्य आहे. संस्कृत मधील आशयाचे तंतोतंत व सुसंगत असे भाषांतर व्हावे याकरिता विशिष्ट एप्लीकेशन, सॉफ्टवेअर तयार केली जातात. त्यामध्ये तशा स्वरूपाचा डेटा दिला जातो. यातून या साधनांद्वारे भाषांतर अचूक व गतीने करणे शक्य होते. अशा विशिष्ट विकसित ॲप्स मधून अचूकता साधण्याचा सुनिश्चित प्रयत्न असतो.

3.5 बहुभाषिक संवाद -

भाषांतर तंत्रज्ञानामुळे विविध भाषेत लोकांमध्ये संवाद साधने सुलभ होते. तसेच व्यवसाय, शिक्षण, पर्यटन, संस्कृती, विचारांचे आदान प्रदान इत्यादींसाठी सुकर संवाद साधता येतो. संस्कृत भाषेतील प्राचीन ज्ञानाचा साठा वैश्विक स्तरावर आणणे अधिक सुलभ होते.

3.6 संस्कृत भाषा शिक्षणास उपयोग -

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कोणत्याही भाषेचा व्यक्ती संस्कृत भाषेचा अभ्यास करू शकतो. शिवाय संस्कृत भाषेतील विविध ग्रंथांचे अवलोकन करू शकतो. त्यातील ज्ञान विज्ञानाच्या स्त्रोताचा उपयोग करू शकतो. अन्यभाषिक अभ्यासक देखील त्या त्या भाषेच्या विकासासाठी संस्कृत भाषेतील विविध घटकांचा विनिमय करू शकतात. संस्कृत भाषेतील भाषांतरामुळे त्यातील सूक्ष्मपणा तसेच एकूण रचना याची पद्धती समजून घेऊन संशोधक अन्य भाषांना भाषिकदृष्ट्या योगदान देऊ शकतात.

3.7 संस्कृत भाषेचा प्रसार -

तंत्रज्ञानाच्या साह्याने संस्कृत भाषेचा प्रसार करणे सोयीस्कर झालेले आहे. अन्य भाषिकांना आपली मूळ भाषा सोडून संस्कृत भाषेचा अभ्यास करणे तसेच स्वभाषेतील शब्दांना संस्कृत भाषेतील प्रतिशब्द याबाबत माहिती घेणे सहज शक्य होते. संस्कृत भाषेतील विविध शब्दांचे अर्थ त्यांच्या अर्थछटा तसेच विशिष्ट शब्द विशिष्ट

संदर्भाने वापरणे याबाबतची माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सहज सुलभ होते. संस्कृत भाषेतील प्रचंड ज्ञानासाठा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अत्यंत कमी वेळात शोधता येतो. भाषेतील अपेक्षित

घटकांपर्यंत अचूकपणे पोहोचणे शक्य होते. तसेच तांत्रिक भाषांतर प्रणालीमुळे संस्कृतातील विविध शास्त्रांचे भाषांतर करणे शक्य झाले आहे. याचा विनियोग अन्य भाषेतील संशोधनासाठी पूरक ठरतो.

संस्कृत भाषांतरातील तंत्रज्ञानाच्या मर्यादा –

संस्कृत भाषांतर करत असताना तंत्रज्ञानाच्या काही मर्यादांचा पुढीलप्रमाणे विचार करता येईल.

4.1 भाषिक समस्या -

संस्कृत भाषेमध्ये हस्व, दीर्घ त्याचप्रमाणे हलन्त, रफार, विसर्ग, दंड यांचा विचार प्रामुख्याने केला जातो. याबाबतीत तांत्रिक दृष्ट्या अद्यापपर्यंत सुयोग्य रचना नसल्यामुळे भाषांतर करताना अचूकता साधने कठीण जाते. तसेच संस्कृत भाषेचे व्याकरण प्रगल्भ आहे. त्यातील रचना व तंत्रज्ञान यांचा समन्वय साधला जाईल व अचूक भाषांतर होईल याची शक्यता कमी असते.

4.2 अचूकतेचा अभाव-

भाषांतर तंत्रज्ञान अजूनही पूर्णपणे विकसित झालेले नाही. सध्या हे तंत्रज्ञान प्राथमिक स्तरावर चांगल्या पद्धतीने कार्य करू शकते. परंतु यालाच अंतिम व अचूक कार्य म्हणता येणार नाही. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केलेले भाषांतर यामध्ये भाषेत व्याकरणिक अर्थ, भाव यादृष्टीने विचार करता होणारे भाषांतर हे तंतोतंत व अचूक असेल असे नाही. पुरवलेल्या डेटा आधारित भाषांतर तंत्रज्ञान प्रणाली असल्यामुळे त्यावर मर्यादा येतात परिणामी अचूक भाषांतराचा अभाव ठरतो.

4.3 तंत्रज्ञानावर अवलंबून राहणे -

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भाषांतर या पद्धतीवर अवलंबून राहिल्याने भविष्यात भाषा कौशल्य कमी होऊ शकते. त्याचप्रमाणे भाषांतर कौशल्य कमी होऊन भाषिक समज संपुष्टात येऊ शकते. तसेच भाषांतर कार्यातील गुणवत्ता आणि अचूकता साधने याबाबत सुनिश्चितपणा सांगता येत नाही. कालांतराने भाषांतर कौशल्य नष्ट होऊन भाषिक घटक समजणे देखील कठीण होऊ शकते. याशिवाय भाषांतरकार असणाऱ्यांच्या नोकऱ्या देखील धोक्यात येऊ शकतात.

4.4 तांत्रिक मर्यादा -

संस्कृत भाषांतरासाठी सध्या वर्डनेट, गुगल ट्रान्सलेटर् इत्यादी तंत्रज्ञान साधने वापरली जातात. परंतु त्यांच्या अद्ययावत् आवृत्ती किंवा आवश्यक साधने यांची कमतरता दिसून येते. तसेच विशेष करून संस्कृतसाठी आवश्यक तंत्रज्ञान साधने, भाषांतर पद्धती यामध्ये अद्यापपर्यंत आवश्यक तेवढी प्रगती झाल्याचे दिसून येत नाही. याचा परिणाम भाषांतरावर निश्चितपणे होतो व त्रुटीयुक्त भाषांतर झाल्याचे निदर्शनास येते.

4.5 भाषांतर कौशल्य अभाव -

तंत्रज्ञान हे भाषांतराचे एक कृत्रिम साधन आहे. यामध्ये मानवी भाव, भावना, विचार यांचा अभाव असतो. त्यामुळे भाषांतर करत असताना प्रत्यक्ष मानवा द्वारे केलेले भाषांतर त्यामध्ये आवश्यक अथवा अपेक्षित भाव, संदर्भ, भावना विचार इत्यादींचा अभाव दिसून येतो. यादृष्टीने तंत्रज्ञानाद्वारे भाषांतर याला मर्यादा येतात.

4.6 गोपनीयता व नैतिकता -

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भाषांतर करत असताना यांत्रिक पद्धती किंवा ए आय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर केल्यास गोपनीयता व नैतिकता याबाबत साशंकता आहे. कारण भाषांतरित गोपनीय राहील तसेच त्यातील नैतिकता जपली जाईल, कोणत्याही प्रकारचा पक्षपात होणार नाही, याबाबत स्पष्टता नाही. शिवाय यातून मानवी भाषांतरकार यांचे अवमूल्यन होऊन कालांतराने असे कौशल्ययुक्त भाषांतरकार यांची उपलब्धता कालांतराने दुर्मिळ होईल.

4.7 भाषांतर समस्या / मर्यादा -

वैदिक व अभिजात अशा दोन्हीही प्रकारांमध्ये भाषांतर करत असताना तांत्रिक अनुवाद समस्या निर्माण होऊन त्याला मर्यादा येतात. कारण वैदिक शब्द त्यांचे अर्थ तसेच अर्थछटा याबरोबर अभिजात संस्कृतीतील शब्द त्यांच्या अर्थछटा यांचे आकलन यांत्रिक पद्धतीने अथवा तंत्रज्ञानाच्या साह्याने अचूकपणे होणे याची शक्यता खूप कमी आहे. त्यामुळे अचूक व गुणवत्तापूर्ण भाषांतर प्राप्त करणे कठीण होते.

5. निष्कर्ष-

तंत्रज्ञानाच्या सहाय्यामुळे संस्कृत भाषेतील ग्रंथांचे भाषांतर करणे सुलभ झाले आहे. तसेच संस्कृत भाषेतील भाषांतर प्रक्रियेला अनेक संधी प्राप्त होत आहेत. यांत्रिक अनुवाद किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता, भाषिक संसाधने यांच्यामुळे प्राथमिक स्तरावर भाषांतर सुलभ झाले आहे. डेटा युक्त असणाऱ्या तांत्रिक संसाधनांमध्ये अचूक शब्द वाक्य यांचे अन्य भाषांमध्ये भाषांतर करणे सुलभ आहे. तंत्रज्ञानामुळे अनेक भाषांमध्ये संस्कृत भाषेतील आशयाचे भाषांतर तसेच संस्कृतचे ज्ञान प्रसारित करणे सुलभ झाले आहे. तंत्रज्ञानाच्या भाषांतर प्रणालीमुळे संस्कृत मधील कठीण भागाचे सुलभिकरण शक्य झाले आहे. तंत्रज्ञानामुळे संस्कृत भाषा प्रसार यासाठी देखील मदत होत असल्याचे दिसून येते. याबरोबर संस्कृत भाषेतील व्याकरण शब्दरचना, सांस्कृतिक संदर्भ यांच्या दृष्टीने विचार करता भाषा संदर्भाच्या अनुषंगाने तंत्रज्ञानाच्या वापरात बऱ्याच मर्यादा आहेत. यावेळी मानवी अनुवाद प्रक्रिया महत्त्वपूर्ण ठरते असे दिसून येते. मानवी भाव, भावना, विचार, संस्कृती इत्यादींचा तांत्रिकदृष्ट्या अभाव

असल्यामुळे तंत्रज्ञाना आधारित भाषांतर याची अचूकता कमी असते. संस्कृत भाषा व तिच्या वैशिष्ट्यांमुळे तंत्रज्ञानामध्ये अजून प्रगतीकरण करणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

संदर्भग्रंथसूची -

1. Vaishali Kherdekar1, Sachin Naik2, Dhananjay S. Deshpande3, Pravin Metkewar – 2024- Importance of Sanskrit Language in Natural Language Processingand Machine Translation: a Review - Page No -3518

2. Nikhil Ramesh et al. (Machine Translation: Sanskrit to English) -2020- Page No – 6558-6560

3. Muskaan Singha,Ravinder Kumara,Inderveer Chanab – 2020- Corpus based Machine Translation System with Deep Neural Network for Sanskrit to Hindi Translation - Page No –2536-2540

4. N Biraja Isac 1 , Himansu Das 1.2017- A Sanskrit Linguistic IntelligencePipelinefor Enhanced Neural MachineTranslationofClassical Texts – Page No- 4-9

5. Ishwari S. Kulkarni1, Anushree N. Pandit1 , Priya A. Kharate1 , Swapnali S. Tikkal1 , Dr. Sandeep Chaware2 - PROPOSED DESIGN TO RECOGNIZE ANCIENT SANSKRIT MANUSCRIPTS WITH TRANSLATION USING MACHINE LEARNING - Page No- 2-4

6. Sinha, R. M. K., & Jain, A. (2009). An English to Sanskrit machine translation system. *Proceedings of ICON Conference*, 1–8.

7. Sadana, R., & Rattan, D. (2017). A comparative study of machine translation systems for Sanskrit language. *International Journal of Advanced Research in Computer Science, 8*(5), 112–118.

8. Bhadwal, N., Sharma, R., & Gupta, S. (2019). Rule-based machine translation system for Hindi to Sanskrit. *Scalable Computing: Practice and Experience, 20*(3), 567–576

9. Ramesh, N., Kumar, A., & Singh, P. (2020). Machine translation for Sanskrit to English using NLP techniques. *International Journal of Psychosocial Rehabilitation, 24*(5), 1234–1245.

* * *

महानुभाव पंथातील मराठी- संस्कृत अनुवादाची परंपरा

डॉ. भारत पांडुरंग मिसाळ
अध्यासन प्रमुख
भगवान श्रीचक्रधर स्वामी अध्यासन,
रा.तु.म.ना.वि.नागपूर

सारांश

12 व्या शतकात सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथाच्या रूपाने एका नव्या विचार प्रणालीची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली. चक्रधर स्वामींच्या दैनंदीनीचा आढावा घेणारा समृद्ध आद्य ग्रंथ लीळाचरित्र शके १२०० मध्ये पंडित माइमभट्ट यांच्या लेखणीतून रीध्दपूर येथे निर्माण झाला. पुढे त्यांचाच आदर्श घेवून अनेक आचार्यांनी संस्कृत आणि मराठी भाषेत आपल्या ग्रंथरचना केल्या. या कालखंडात मूळ मराठी भाषेत असलेले ग्रंथ संस्कृत भाषेत अनुवादित झाले. जवळपास १०० च्या आसपास ग्रंथ असावेत. निर्माण झाले. काही ग्रंथ तर मराठीतुन संस्कृत मध्येही अनुवादित झालेले पाहायला मिळतात. पंथ केवळ महाराष्ट्रापुरताच सीमित राहू नये या उदात्त प्रेरणेने प्रेरित झालेल्या महानुभावीय संस्कृत पंडितांनी केवळ मराठी भाषेलाच न जोजवता सुरभारतीलाही पंथीय साहित्याने अलंकृत करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यामुळे महानुभाव पंथाने संस्कृत आणि मराठी अशा दोन्ही भाषांचा समन्वय घातलेला दिसून येतो.

महानुभाव पंथातील सुरुवातीचे मराठी ग्रंथ नंतरच्या आचार्यांनी त्यांचे संस्कृत मध्ये सुद्धा अनुवाद केल्याचे आढळते. म्हणजेच महाराष्ट्रात यादवकाळात या अनुवाद पद्धतीला प्रारंभ झाला हे सत्य आहे. यामध्ये तीन अनुवाद परंपरा आढळून आल्या. गद्य मराठीपासून - पद्य संस्कृत अनुवादीत साहित्य, गद्य मराठीपासून – गद्य संस्कृत अनुवादीत साहित्य, पद्य मराठीपासून - पद्य संस्कृत अनुवादीत साहित्य अशा या तीन परंपरा संशोधनांती आढळून आल्या आहे. यामध्ये एक विलक्षणता आहे. आजवर संस्कृत मधून इतर भाषेत झालेले अनुवाद आपण पाहिले आहे, परंतु एखाद्या प्रादेशिक भाषेतून संस्कृत मध्ये अनुवाद झाल्याची पहिली घटना महानुभाव पंथात विशेषत महाराष्ट्रात घडली आहे. म्हणून यादव काळातील अनुवादित साहित्याकडे पाहण्याच्या कक्षा अधिकच व्यापक झाल्या आहे.

उद्दिष्ट्ये

१ यादवकालीन कालखंडापर्यंत मराठी साहित्यावर संस्कृत साहित्याचा झालेला प्रभाव अभ्यासणे.

२ महानुभाव पंथाने मराठी–संस्कृत अनुवाद परंपरेची केलेली सुरुवात आणि तिचा विकास याचा अभ्यास करणे.

३ महानुभाव पंथातील ग्रंथाचा तुलनात्मक अभ्यास करून अनुवाद प्रक्रियेचे स्वरूप समजून घेणे.

४ महानुभावांच्या अनुवाद परंपरेत समाविष्ट असलेल्या साहित्य, तत्त्वज्ञान आणि व्याकरण ग्रंथांचे विश्लेषण करणे.

५ महानुभावांच्या अनुवाद कार्यामुळे संस्कृत साहित्यात झालेल्या योगदानाचे मूल्यांकन करणे.

संशोधन पद्धती –

प्रस्तुत शोध कार्यासाठी जे ग्रंथ अनुवादित करण्यात आले आहे. ते ग्रंथ पडताळून पाहण्यासाठी तुलनात्मक पद्धतीचा वापर केला गेला आहे. अनुवाद परंपरेचा इतिहास, विकासाचे टप्पे समजून घेण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. मराठी आणि संस्कृत काव्यातील बदल आणि त्यांचे रूप समजून घेण्यासाठी समीक्षणात्मक पद्धतीचाही उपयोग करण्यात आला आहे.

प्रस्तावना

मध्ययुगीन महाराष्ट्रात अनेक भक्ती संप्रदाय उदयास आलेले होते. त्यातील महानुभाव संप्रदाय एक प्रमुख संप्रदाय होय. यादवकालीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात महानुभाव पंथाचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. 12 व्या शतकात सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथाच्या रूपाने एका नव्या विचार प्रणालीची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली. हा नव्या विचारांची सुरुवात चक्रधर स्वामींनी महानुभाव तत्वज्ञान, मराठी भाषा आणि स्त्रियांचे हक्क व कर्तव्ये आणि बहुजन हिताय बहुजन सुखाय या स्वरुपाची होती. चक्रधर स्वामींच्या दैनंदीनीचा आढावा घेणारा समृद्ध आद्य ग्रंथ पंडित माइमभट्ट यांच्या लेखणीतून समोर आला. पुढे शिष्य मंडळींनी अनेक ग्रंथांची निर्मिती केली. ही सर्व ग्रंथ संपदा मराठी भाषेत होती. त्याबरोबरच संस्कृत भाषेतही १०० च्या आसपास ग्रंथ निर्माण झाले. काही ग्रंथ तर मराठीतुन संस्कृत मध्येही अनुवादित झालेले पाहायला मिळतात. याच विषयाच्या अनुषंगाने या शोधनिबंधात चर्चा केली जाणार आहे.

अनुवाद म्हणजे नेमके काय?

अनुवाद :- "अनुवाद म्हणजे स्पष्ट करू न, उलगडून, विवरण करू न सांगणे. अनुवादात आधीच अवगत असलेल्या अर्थाचे पुन:कथन असते. मूळ संहितेतील संरचनेपेक्षा त्यात अंतर्भूत असलेल्या आशयाला अनुवादात महत्त्व असते. एकाच भाषेतील वा परभाषेतील मूळ विधानांचा अर्थ अधिक विस्ताराने कथन करण्याची सोय अनुवादात असते. त्यामुळे अनुवाद हा मूळ संहिताबरहुकूम असण्याची अट शिथिल असते. शब्दश: केल्या जाणाऱ्या अनुवादाला छायानुवाद म्हणतात तर भावार्थ व्यक्त करणाऱ्या अनुवादाला भावानुवाद म्हणतात. अनुवाद ही संज्ञा `भाषांतर' या अर्थानेही वापरली जाते. मूळ भाषेतील संहितेचे विश्लेषण, संक्रमण पुन्हा संरचन होऊन तिचे ग्राहक भाषेतील अथवा लक्ष

भाषेतील रूप सिद्ध होते तेव्हा ते भाषांतर असते. परभाषेतील साहित्यकृतीतील पात्रांची नावे, स्थलकाल व वागण्या-बोलण्यातील रीतीतील बदलांसह मूळ साहित्यकृतीचे दुसज्या भाषेत जे रू प सिद्ध होते त्याला `रूपांतर' असे म्हणतात."१ प्रस्तुत शोधनिबंधात "महानुभाव पंथातील मराठी साहित्याचे संस्कृत अनुवादीकरण याचाच एकत्रितपणे विचार केलेला आहे.

यादवकालीन परिस्थिती

यादवकालीन कालखंडात महाराष्ट्रात महानुभाव, वारकरी, लिंगायत, नाथ हे संप्रदाय अतिशय चांगल्या रीतीने आपल्या पंथ - प्रचार कार्यात सक्रिय होते. या काळात अनेक बदल झाले, मग हे बदल भाषिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक आदी अंगाने होत गेले. त्याकाळी परंपरागत शिक्षण प्रणाली ही संस्कृत भाषेतून होती. त्यामुळे वेद, गीता, स्मृती आणि पुराणे संस्कृतबद्ध होती. महाराष्ट्रातील तत्कालीन काही पंडितांना या संस्कृत भाषेचे ज्ञान होते. परंतु सामान्य समाज हा मराठीत बोलत असल्याने त्यांच्यासाठी हे ज्ञान संस्कृत मधून मराठीत सांगण्याची तोंडी परंपरा निर्माण झाली. परंतु नंतरच्या कालखंडात या तोंडी परंपरेने नंतर लिखित स्वरूप धारण केले आहे असे दिसते.

तत्कालीन ग्रंथ लेखनाची भाषा ही संस्कृत भाषा असल्यामुळे अनेक संतांवर त्याचा प्रभावही पडलेला दिसून येतो. त्यामुळेच ज्ञानेश्वरांच्या रूपाने ज्ञानेश्वरी हा गीतेवरील महत्वपूर्ण असणारा मराठी ग्रंथ निर्माण झाला आहे संस्कृत मराठीतील एक महत्त्वाचा अनुवादित ग्रंथ आहे. दोन्ही ग्रंथाचे साम्य शोधण्याचा प्रयत्न केला तर असे दिसून येते की, दोन्ही ग्रंथ हे पद्यग्रंथ आहेत. भगवद्गीता ही श्लोकबद्ध आहे. तर ज्ञानेश्वरी ही ओवीबद्ध आहे.

महानुभाव पंथाचा भाषा समन्वय

महानुभाव पंथातील अनुवादाची परंपरा समजून घेताना आपणास तत्कालीन भाषिक भाषिक समन्वय समजून घ्यावा लागेल. त्याबद्दल डॉ. हंसराज जाधव यांनी काही मते नोंदवली आहेत,"२ ते म्हणतात सर्वज्ञ श्रीचक्रधरांनी तीन गोष्टीना महत्व दिले. त्यामध्ये धर्म, भाषा, आणि स्त्री स्वातंत्र्य हे त्यांचे मुख्य विषय होते. लोकांच्या तोंडी असलेली भाषा हीच निरुपणाची भाषा ठरवून प्राकृतला-मराठीला 'देववाणी'चा दर्जा त्यांनी मिळवून दिला. त्यामुळे संस्कृत ऐवजी त्यांनी लोकभाषा मराठीचा आग्रह धरला आणि त्याची अंमलबजावणीही केलेली आहे.

वस्तूत: मराठी ही महानुभावाची धर्मभाषा असल्यामुळे या पंथातील सर्वच ग्रंथांची निर्मिती ही मराठी भाषेतूनच झाली आहे. परंतु हा पंथ केवळ महाराष्ट्रापुरताच सीमित राहू नये या उदात्त प्रेरणेने प्रेरित झालेल्या महानुभावीय संस्कृत पंडितांनी केवळ मराठी भाषेलाच न जोजवता सुरभारतीलाही पंथीय साहित्याने अलंकृत करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. केवळ तात्त्विक दृष्टीने ईश्वरोपासना न करता भाषिक आणि साहित्यिक दृष्टीनेही पंथाला पुढे कसे नेता येईल हा विचार तत्कालीन आचार्यांनी केला आहे. हा संपूर्ण भाषिक समन्वय नेमक्या कोणत्या एका भूमिकेतून जात नाही. कारण संस्कृत

मधून मराठीत अनुवाद झाले आहे. परंतु इथपर्यंतच तत्कालीन महानुभाव आचार्य थांबले नाहीत. महानुभाव साहित्याचे अध्ययन केले असता आपल्याला अनेक नवीन नवीन गोष्टी यातून पहायला मिळेल. मराठी व संस्कृत अशा दोन्ही भाषेमध्ये स्वतंत्र ग्रंथ असताना सुद्धा त्या काळामध्ये काही अनुवादित ग्रंथांची नोंद आपल्याला पाहायला मिळते. संस्कृत मधून मराठी मध्ये अनुवादित झालेल्या ग्रंथांची तर परंपराच होती परंतु असा पहिला प्रयत्न झाला की मराठी भाषेतून संस्कृत मध्ये काही ग्रंथांचे अनुवाद झाले. मराठीतून संस्कृत मध्ये ग्रंथ अनुवादित करण्याचा मान सुद्धा महानुभावांना जातो हे निर्विवाद सत्य आहे.

महानुभाव संस्कृत भाषेकडे का वळले?

महानुभाव संप्रदायाची आणि चक्रधर स्वामींची भाषा ही जर मराठी होती तरीपण महाराष्ट्रातील संस्कृत परंपरा सुद्धा महानुभावांनीच जपली हेही तेवढेच सत्य आहे. मग महानुभावांचे हे संस्कृत प्रेम म्हणावे की भाषाप्रभुत्व म्हणावे? या संबंधी डॉ. अविनाश आवलगावकर यांचे पुढील मत खुप महत्वाचे आहे ते म्हणतात "महानुभावांच्या संस्कृत साहित्य निर्मितीच्या संदर्भात धर्माला स्थैर्य आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याची भूमिका नव्हती तर हे सर्व सांप्रदायिक अभ्यासक संस्कृत साहित्याचे आणि शास्त्राचे गाढे अभ्यासक होते. धर्मवार्ता आणि धर्मचर्चा तत्कालीन पंडितांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग होता. त्यामुळे संस्कृत भाषा त्यांच्या इतकी अंगवळणी पडली होती की, ते सहजगत्या त्या भाषेचा बोलीभाषा म्हणून वापर करत असत. मूळ मराठी रचनेचा संस्कृतबंध तयार करण्यात त्यांना नवनिर्मितीचाच आनंद मिळत असावा. कदाचित पांडित्य पणाला लावण्याचाही प्रयत्न असावा. परंतु त्यात स्वान्तसुखाय भूमिकाच अधिक महत्त्वाची होती. हे डॉ. आवलगावकर यांचे मत योग्य ठरते."३

या संबंधी आणखी एका मताचा इथे जरूर उल्लेख करावा लागेल. डॉ. मीनाक्षी भांदककर आपल्या महानुभाव पंथाचे संस्कृत साहित्याला योगदान या ग्रंथात म्हणतात की"४ "श्रीचक्रधर स्वामींच्या परावरज्ञान सामर्थ्याने त्यांच्याकडे जे विद्वान, अध्ययनशील तत्त्वज्ञानी, सांप्रदायिक आणि रसिक पंडित आकृष्ट झाले होते, ते संस्कृत साहित्याचे आणि व्याकरण शास्त्राचे गाढे अभ्यासक होते. बालपणापासून या सर्व पंडितांचे अध्ययन अध्यापन देवभाषेतूनच झाले असावे. त्यांची संस्कृत भाषेवरील आस्था कायम होती. एखादी गोष्ट अत्यंत कुशलतापूर्वक करता येत असूनही ती न करण्याचा आदेश असताना मनाची जी घालमेल होते, तीच या कवींची झाली आहे. म्हणूनच या विद्वान ज्ञानीयांना संस्कृत भाषेत ग्रंथनिर्मिती करण्याचा मोह आवरता आला नाही. यामुळे ही सर्व आचार्य मंडळी संस्कृत भाषेकडे वळली असावी. त्यांचे हे मत निश्चितच आधारमुलक आहे.

शिवाय तत्कालीन सांप्रदायिकांची प्रमुख धर्मभाषा ही संस्कृत होती. सर्वच धार्मिक ग्रंथ हे संस्कृतात होते. धर्म जाणणारे आणि समजणारे विद्वान हे संस्कृत पंडित होते. म्हणून महानुभाव तत्त्वज्ञानाचे वेगळेपण इतरांनी जाणून घ्यावे आणि महानुभाव पंथाची अवहेलना करणाऱ्या तथाकथित

पंडितांना स्वामींचे शिष्यही भाषाशास्त्र आणि व्याकरणात कुठेच कमी नाहीत हे पटवून देण्यासाठीच महानुभावीयांनी संस्कृतातून रचना केल्या असाव्यात असाही एक तर्क या ठिकाणी मांडला जाऊ शकतो.

महानुभाव पंथातील मराठी वाङ्मयीन साहित्यकृतीचे संस्कृत अनुवादीकरण

महानुभाव पंथातील अनुवाद परंपरेची पुढील प्रमाणे विभागणी करता येईल

अ. क्र	महानुभाव मराठी वाङ्मयीन कृती	स्वरूप-कालखंड	संस्कृत अनुवादित साहित्य	स्वरूप-कालखंड
१	पंडित म्हाइमभट्ट संकलित – लीळाचरित्र	गद्य	पंडित केशराज व्यास विरचित रत्नमाला स्तोत्र	पद्य
२	पंडित केशीराजबास संकलित - दृष्टांत पाठ	गद्य	पंडित केशराज व्यास विरचित दृष्टांत नामावली स्तोत्र	पद्य
३	पंडित भास्कर भट्ट बोरीकर विरचित मराठी पूजा अवसर	पद्य	पंडित भास्कर भट्ट बोरीकर विरचित संस्कृत पूजा अवसर	पद्य
४	सर्वज्ञ श्री चक्रधरोक्त सूत्र पाठ	गद्य	सर्वज्ञ श्री चक्रधरोक्त ब्रह्मविद्या शास्त्र (पं. चक्रपाणी व्यास)	गद्य
५	सर्वज्ञ श्रीचक्रधरोक्त बत्तीस लक्षण	गद्य	पंडित आनेराज व्यास विरचित लक्षण रत्नाकर	पद्य

महानुभाव पंथातील अनुवाद परंपरा

महानुभाव पंथातील अनुवाद परंपरेची पुढील प्रमाणे विभागणी करता येईल

१) गद्य मराठीपासून - पद्य संस्कृत अनुवादीत साहित्य

रत्नमाला स्तोत्र प्रारंभीचा ग्रंथ

मराठी साहित्यातील पहिला चरित्रात्मक ग्रंथ म्हणून लीळाचरित्राकडे पाहिल्या जाते. महानुभाव संप्रदायाचा हा बीजग्रंथच होय. यातूनच महानुभाव संप्रदायाच्या सर्व साहित्याची निर्मिती झाली आहे.

शके १२०० (इ.स.१२७८) मध्ये पंडित म्हाइमभट्ट यांनी चक्रधर स्वामींच्या आठवणी भक्तीजनांना विचारून आचार्य नागदेवांच्या परवानगीने ह्या सर्व लीळांची बांधणी केली आहे.

पंडित केशिराज व्यासांनी लीळाचरित्र या गद्य ग्रंथाचा अनुवाद संस्कृत भाषेत पद्यमय स्वरूपात केला. पंथीय संस्कृत साहित्यात चरित्रकाव्य लिहिणारे ते पहिले कवी आहेत. खरे तर हा ग्रंथ तीन कवींनी मिळून केला आहे. परंतु याचे खरे श्रेय हे पंडित केशीराजव्यास यांनाच दिले जाते. 'रत्नमालास्तोत्र' या महाकाव्य चरित्रग्रंथाची विभागणी दोन भागात केली आहे. पूर्वार्धात १७०५ आणि उत्तरार्धात २०५४ श्लोकसंख्या आहे. एकूण ३५५९ श्लोकात हा ग्रंथ श्लोकरूपाने बांधला गेला आहे. याचे एक उदाहरण पाहूया. पैठण येथे एक सूर्यमंदिर उग्रादित्य या नावाचे होते. हे श्रीचक्रधरप्रभूंचे आवडते विहरणस्थान होते. त्याविषयीचे लीळाचरित्रातील पुढीलप्रमाणे उल्लेख येतो.

अ) 'उग्रादैत्यी सारंगपंडिता निरए निरूपण : गोसावियासि गणपति मढी अवस्थान : गोसांवियाति उदेयाचा पुजाअवस्वरू जलियानंतरहे गोसावी उग्रादैत्याचेया देउळा बीज केले : उग्रादित्याचा चौकी आसन जाले : "

ब) 'गोसावियांसि गणपतिमढि अवस्थान : गोसांवियासि उदेयाचा पुजाअवस्वरू जलियानंतरे उग्रादीत्याचेया देउळा वीहरणां बीजे केले "

क) 'एकु दीसी गोसावियांसि उदेयाचा पुजाअवस्वरू. जलियानंतरे : गीसावियांसि उग्रादैतीं आसन असे"५

रत्नमाळास्तोत्रातील वर्णन असे "६

उग्रादित्याळये देवो विहर्त्तुमेकदान्यगात्

सहित: शाङ विप्रेण दृष्ट्वा तान्निरयान्प्रभुः ॥१०७१॥

उग्रादित्ये पुनर्देवो जगाम शाङ, संयुतः

विप्रं जगाद सर्वात्मा काळदंष्ट्रागतो जन: ॥१०७२॥

उग्रादित्याळये क्वापि संस्थितः परमेश्वरः

एकांबिका नमस्कर्तुमागता जगदीश्वरं ॥११०७॥

वरील मूळ मराठी गद्याची भाषा आणि अनुवादित संस्कृत श्लोकांची भाषा आशय एक असला तरी खूप भिन्न आहे. गद्य स्वरूपाची चव या श्लोकाला येणार नाही. आणि श्लोकांची चव गद्य मराठीला येणार नाही. परंतु ही नवनिर्मिती मराठी-संस्कृत अभ्यासकांना फार मोठी ओढ निर्माण करते हेही तितकेच सत्य आहे. या संबंधी अजून एक नमुना पाहुयात.

२) गद्य मराठीपासून गद्य संस्कृत अनुवादीत साहित्य

या महानुभाव पंथाच्या अनुवाद परंपरेत फक्त पद्य महानुभाव साहित्याचेच अनुवाद झाले नाहीत तर गद्य मराठी ते गद्य संस्कृत असेही अनुवाद झालेले आहेत यामधील उत्तम उदाहरण म्हणजे ब्रह्मविद्याशास्त्र अर्थात सर्वज्ञ श्री चक्रधरवक्तसूत्र पाठ हा एक मुख्य ग्रंथ आहे या सूत्रपाठ ग्रंथाचेच अनुवादित रूप म्हणजेच इसवी सन 1621 मध्ये पंडित चक्रपाणि व्यास या महानुभाव कवीने सूत्र पाठाचे रूपांतरण संस्कृत भाषेत गद्य स्वरूपात केलेले आहे तीनशे चारशे वर्षांपूर्वी घडलेली ही घटना संस्कृत तथा मराठी साहित्याला एक नवे आयाम देते यामध्ये विशेष बाब म्हणजे मराठी सूत्राचे जशास तसे रूपांतरण झाले आहे.

उदाहरण १

(पूर्वी प्रकरण)

सृष्टीमध्ये कव्हणे करणें मुंचीजेनाः एके परमेश्वरे विणः तोच परमेश्वर निर्वेव निराकार असेः पर कृपावशे सावेव साकार होएः अवतरे आपुले सान्निधान देः ते दास्यमोचक (श्रीचक्रधरोक्त सूत्र पाठ पूर्वी प्रकरण) "७

(मूलम्)

परमात्मनैकेन विना सृष्टोन केनचि-दपि करणेन जीवा मुञ्चन्ति, यद्यपिस निराकारः परं कृपापरतन्त्रः साकार:, सन्नात्मानं सृजति तत्सन्निहिताश्च जीवास्तदास्येनैव मुञ्चन्ति। (श्रीचक्रधरोक्त ब्रह्मविद्याशास्त्र पूर्वी प्रकरण) "८

सूत्रपाठाचे मराठी मधून संस्कृत झालेले हे रूपांतरण एक उत्तम नमुना आहे. यामुळे संस्कृत भाषिक अभ्यासकांना सर्वज्ञ श्री चक्रधरांची तत्त्वज्ञान समजण्यास अधिक सुलभ पणा आलेला आहे त्याचबरोबर हे तत्त्वज्ञान एका महत्त्वपूर्ण भाषेमध्ये विधीत झाल्यामुळे त्यास एक वेगळा दर्जा प्राप्त झालेला आहे. चक्रपाणि व्यासांनी केलेले हे कामकाज खऱ्या अर्थाने खूप महत्त्वपूर्ण आणि अमूल्य असे आहे या रूपांतरणामध्ये त्यांनी मूळ सूत्रपाठामध्ये कोणताही बदल केलेला दिसून येत नाही.

उदाहरण २

प्रस्तुत लीळेमध्ये श्रीगोविंदप्रभू आणि सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांची ऋद्धिपूर येथील रांधवणहाटात झालेल्या पहिल्या भेटीचे वर्णन अत्यंत रमणीय आणि वंदनीय केले आहे.

मग गोसावी उतरील दारवंठेनीः सवळेचीया पाहारा दीसा': परमेश्वरपुरासी आले: नगराआंतु बीजें केलें: रांधवन हाटीं श्रीप्रभूसीं दरीसन जालें: पुर्वपसीम दोन्ही वोळीः उतरदखीण दीघडीयाः पसिमील वोळि पुर्वाभिमुख आमचे गोसावीः पुर्वीली वोळि पसिमामुख श्रीप्रभूः अर्ध वस्त्र वेढिलें असेः अर्ध

उतरासंगे प्रावरण केलें असेः मोकळा कासोटाः नाभिचुंबीत खाडः मोकळे केसकळापः डावा श्रेनेत्रु अर्धोन्मीलितु : डावीये श्रीकरिची आंगुळी वांकट': आमचां गोसावी": श्रीप्रभूतें देखौनि कायाप्रणीत केलें: आणि आपणेया आपण क्षेमाळींगन दीधलें: आणि आमचेया गोसावीयांतें देखौनि स्त्रीप्रभू म्हणीतलें: "ऐया माझा जाला म्हणेः आतां होये म्हणें: श्रीप्रभूचां एकीं श्रीकरीं सेंगळें: एकीं श्रीकरीं बुडडे चावीति थुंकीतिः हास्य करीतिः गगनाची वास पाहातिः आमचे गोसावी श्रीप्रभूची लीळा अवळोकीतिः श्रीप्रभू आमचेयां गोसावीयांची वास पाहातिः आणि गोसावी श्रीमुगुट खोलवीतिः श्रीप्रभूचां श्रीकरीं सेंगळें बुडडें होतें: सेंगुळे आरोगुं सरलें होतें: बुडडें आरोगावें होतें: तें श्रीप्रभू म्हणीतलें: “आरेः घे” घे” म्हणें: घे ना म्हणें: आरे घे घे:"" म्हणौनि प्रसादु करुनि दीधलें: आमचा गोसावीं माहाप्रसादु म्हणौनि कायाप्रणीत करुनि दोहीं श्रीकरीं धरुनि नमस्कारिलें: आणि श्रीप्रभू आमचेयां गोसावीयांचेया श्रीमुखावरि श्रीकरू ठेविलाः तेथ आमचा गोसावीं ज्ञान-शक्ती स्वीकरिलीः परावर-शक्ति स्वीकरिलीः आमचां गोसावीं पूर्वीलेनि दारवंठेनि बीजें केलें: श्रीप्रभू माहाद्वारवरि बोळवीत आलेः तेयां दीसीं तळेगावीं वस्ति जालीः ज्ञानाचें कार्य ऐसें जें ज्ञानापाठीं वैराग्य उपजेः मग गोसावीं तेहीं स्वीकरिलें: ।। "९
(लीळाचरित्र पूर्वार्ध २०)

वरील मूळ लीळा अभ्यासली असता असे लक्षात येते की , मराठीमध्ये ही लीळा सांगताना सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी संपूर्ण रीतीने इथे व्यक्त झाले. परंतु याच लीळेचा अनुवाद करताना इथे केशीराज व्यासांची बुद्धी उक्त झाली आहे. ते या लीळे पाठीमागची भूमीका आणि गुरुशिष्य संबंधाची जाणीव छान पद्धतीने करवतात. हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. मूळ लिळेतील गुरू शिष्य संबंधाचेच वर्णन केशिराज व्यास यांनी केले नाही तर, त्याच्याही पलीकडे जाऊन स्वतःच्या मतांची ते मांडणी करतात.

अशेषशक्त्यालय ईश्वरोऽसौ नित्यं तदा किं जगृहे च तस्मात् । इत्थं तयोरीश्वरोश्चरित्रं को वेदितुं वा गदितुं समर्थः ।।

य एक ईशो युगपद् दधानो मूर्तिद्वयं चारुतरं धरिष्याम्। दध्रे स्वयं सेवकसेव्यभावं तां वेत्ति कस्तस्य परां प्रवृत्तिम् ।।८।। "१०

सर्व शक्तींचा साठा असलेल्या त्या ईश्वराने तेव्हा काय बरे ग्रहण केले असेल? हे त्या उभय ईश्वराचे चरित्र जाणण्यास आणि वर्णन करण्यास कोण बरे समर्थ आहे? तो एकच ईश्वर दोन रूपे धारण करणारा दोन अतिशय सुंदर मूर्ती धारण करता झाला आणि स्वतःच सेवक-सेव्यभाव निर्माण करता झाला. त्याची ती प्रवृत्ती जाणण्यास कोण बरे समर्थ आहे?

अशाप्रकारे हे अनुवाद नुसते अनुवाद नाहीतर कवीच्या मत प्रकटिकरणाला आणि कल्पकतेलाही यातून दाद द्यावी लागेल.

३) पद्य मराठीपासून - पद्य संस्कृत अनुवादीत साहित्य

सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींची दैनंदिन विधी म्हणजेच पूजावसर होय. चक्रधर स्वामींच्या प्रातःकाळी उठण्यापासून ते झोपण्यापर्यंतचा सर्वच दिनक्रम या पूजावसरात अंतर्भूत झालेला आहे. जसा वारकरी संप्रदायात सकाळी आणि संध्याकाळी हरिपाठ म्हटला जातो तसा महानुभाव संप्रदायात पूजावसर म्हटला जातो. पंथाचे दुसरे आचार्य बाईदेव व्यास यांनी लीळा चरित्राचा सखोल अभ्यास करून पूजावसर काव्याची निर्मिती केली आहे. त्यांची कृती गद्य स्वरूपाची होती परंतु पुढील कवींनी आपले पूजा अवसर हे पद्य स्वरूपात बांधलेले आहे. या परंपरेत स्वतन्त्र मराठीतून निर्माण झालेल्या पद्य रचनाच पुढे पद्य संस्कृत मध्ये तयार झालेल्या आहेत. पंडित दामोदर व्यासांनी इ.सन १३०१ ते १३१६ मध्ये पहिला संस्कृत पद्य पूजा अवसर तयार केलेला आहे. हा पूजा अवसर श्री गोविंद प्रभू यांच्या दैनंदिनी लीळा संदर्भामध्ये आहे. सहा श्लोकांचा हा अगदी छोटा पूजावसर आहे. दुसरा पूजावसर हा पंडित राघवभट्ट यांचा असून त्यांनी इसवी सन १३१२ ते १३१५ दरम्यान हा पूजा अवसर रचलेला आहे. हा पूजा सर्व १२ श्लोकांमध्ये बांधलेला आहे. तिसरा पूजावसर हा पंडित भास्करभट्ट बोरीकर यांनी तेराशे १३०० ते १३२३ दरम्यान मराठी आणि संस्कृत अशा दोन्ही पूजावसरांची स्वतंत्रपणे पहिली निर्मिती केली असे म्हणावे लागेल. तर चौथा संस्कृत पूजावसर पंडित भीष्माचार्य यांनी इसवी सन १५७८ ते १६०८ दरम्यान रचलेला आहे. या चारही पूजाअसराच्या बाबी लक्षात घेतल्या तर मराठी आणि संस्कृत मध्ये एकच रचना करणारे भास्करभट्ट बोरीकर हे काही वेगळेपणाने दिसून येतात. त्यांचा मराठी पूजा अवसर हा ओवीबद्ध असून यामध्ये साठ ओव्या आहेत तर संस्कृत पूजा अवसर हा श्लोकबद्ध असून तो २७ श्लोकांमध्ये बांधलेला आहे.

उदाहरण

मराठी पुजावसर

स्वामी परिश्रया निगती" । बाइसें दीपु उजळीति

उष्णेदक बहिर्वासू देति । नागेंद्राहातीं ॥१२॥

उष्णोदका " विनयोगु जाला । चोखट बहिर्वासु वेढिला

मग चंद्रासनी बैसला | श्रीचक्रधरु ॥ १३ ॥

तियें चरणकमळें निरुपमें । बाइसीं परिमार्जिलींप्रे मे

तवं स्वासनी १९ आत्मारामें । अवस्थान केले ॥१४॥

सुर्योदयी दंतपंक्ति । सिळिका २१ चोखाळिता

वक्र सिळिका फेडिति । जिव्हामळ ॥ १५ ॥ (पं. भास्करभट्ट विरचित मराठी पुजावसर)" ११

संस्कृत पुजावसर

नागांबिकाकमळकोमळमासनं सादीप प्रकाशमकरोत्सलिलंच सोष्लम्।
शौच चकार सुयशा: पयसायतेन नागार्जुनेन सह चक्रधरः प्रयात:॥३॥

नागांबयायपरिमार्जितपादपद्मस्तत्रासने स्वरमणः स्वसुखोपविष्टः ।
आनंदकंदसदन: समचंचळांग: कैवल्यमूर्तिस्य निर्वचनो बभूव ॥ ४ ॥

सूर्योदये दशनशोधनतां विधाय जिव्हामळान् शिलिकयांतर वक्रयेशः ।
मंद मुमोच जगतां जनक: कराभ्यां श्रीमान् पारकरुणाकरचक्रपाणिः ॥५॥

गंडूषमंडित वरधरदंतपंक्तिः सुस्नातमायतसुखायतनं चकार ।
सौदर्यवर्यवदनं सदनेश यशश्रियः श्रियपतिस्सुमनसापयसा स ईशः ॥६॥

नागांबयामरवरांघ्रि सरोरुहेते धौते भजन्भव भिया भयदंतदंभ: ।
ईशार्थिनाथ सुरसुंदर चक्रपाणे: सादासिका पुलकिता तिलकं चकार॥७॥

कंठेलसत्परिमळाळयपुष्पमाळां नीराजनं च वरदीप परंपराभिः।
धूपं तदोष्टपुटमंडनं चारुरुपं जग्राहवीटकमय स्फुटितांबुजाक्षः॥८॥

(पं. भास्करभट्ट विरचित संस्कृत पुजावसर) "१२

वरील दोन्ही पूजा अवसर हे प्रात:कालीन पूजा अवसर असून यामध्ये बरेचसे साम्य आहे. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या दैनंदिनी मध्ये घडलेल्या घटनांचा अंतरवेध या पूजावसरामध्ये घेतलेला आहे. या दोन्ही रचना श्री चक्रधर स्वामींच्या डोमेग्राम येथील दैनंदिनीवर आधारित आहे.यामध्ये मराठी रचना या ओवीबद्ध आहे तर संस्कृत रचना या अक्षरगणवृत्तातील वसंत तिलका या समवृत्त छंदात आहे. या दोन्ही रचनातील प्रतिपाद्य विषय एकच असून हे अनुवादित साहित्य असले तरी त्यातील अभिव्यक्ती ही वेगवेगळी आहे. प्रसंग साधा जरी असला तरी त्यातील भावस्पर्शी वस्तूलक्षी वर्णन करण्याची एक अभिजात हातोटी या महाकवीच्या काव्यप्रतिभेत आहे असे दिसून येते.

अशाप्रकारे महानुभाव मराठी साहित्याचे संस्कृत अनुवादीकरण या काळात झालेले होते. हे अनुवादिकरण टप्प्याटप्प्याने झाले असून यामध्ये मूळ हेतू अनुवाद असा नव्हता . मराठी मधील हे अनमोल साहित्य संस्कृत भाषेमध्ये सुद्धा असावे असा एक हेतू महानुभाव पंडित कवींचा यामधून दिसून येतो. वरील तीन परंपरेत हे साहित्य अनुवादित झाल्याचे प्रथमदर्शनी लक्षात येते संशोधनाअंती अजूनही काही बाबी समोर येऊ शकतात. प्रस्तुत प्रसंगी फक्त अनुवादाचा विषय यामध्ये हाताळला गेलेला आहे.

निष्कर्ष

१) यादवकालीन कालखंडापर्यंत मराठी साहित्य वरती संस्कृत साहित्याचा प्रभाव होता.

२) महानुभाव मराठी साहित्यातून संस्कृत साहित्य अनुवादाची परंपरा प्रथम निर्माण झाली

३) रत्नमालिका स्तोत्र हे मराठी लीळाचरित्राचे अनुवादित संस्कृत रूपांतरण होय येथूनच महानुभाव अनुवादाची परंपरा निर्माण झाली आहे.

४) महानुभावांच्या अनुवाद परंपरेत साहित्य, तत्त्वज्ञान, व्याकरण शास्त्रीय ग्रंथांचे अनुवादीकरण झाले आहे.

५) महानुभावांच्या अनुवादीकरणामुळे संस्कृत साहित्यात मोलाची अशी भर पडली.

६) काही महानुभावीय संस्कृत साहित्य हे संस्कृत भाषेत असून ते सांकेतिक लिपीमध्ये आहे.

संदर्भग्रंथसूची

१. प्रभा गणोरकर व इतर संपा., वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश पृ. ६९

२. सर्वज्ञ श्रीचक्रधरांची तीन बंड., डॉ. हंसराज जाधव (सं.केशर गौरव ग्रंथ) पृ.

३.महानुभाव साहित्य शोध संचार, डॉ. अविनाश आवलगावकर,पृ.३८,३९

४.महानुभाव पंथाचे संस्कृत साहित्याला योगदान, डॉ. मीनाक्षी भांदककर पृ.२८

५.पंडित म्हामभट्ट संकलित लीळाचरित्र, (सं) डॉ.वि.भी.कोलते ली.क्र.४१९,४२०,४७१ उत्तरार्ध

६.आचार्य केशीराजव्यास विरचित "रत्नमाळास्तोत्र,(सं) ब्रम्हानंद देशपांडे उत्तरार्ध १०७१,१०७२,१०७३ पृ.१५७

७.श्रीचक्रधरोक्त सुत्रपाठ, (सं) नेने ह.ना, व्हीनस प्रकाशन, पुणे१९४२

८. श्रीचक्रधरोक्त ब्रह्मविद्याशास्त्र, पं. चक्रपाणी व्यास, संपादक,म. मुकुंदराज आराध्य, प्रथम आवृत्ती जुलै १९२६

९. पंडित म्हामभट्ट संकलित लीळाचरित्र, (सं) डॉ.वि.भी.कोलते ली.क्र.२० (पूर्वार्ध)

१०. आचार्य केशीराजव्यास विरचित "रत्नमाळास्तोत्र,(सं) ब्रम्हानंद देशपांडे रत्नमाला उत्तरार्ध ६०,६१ पृ.३३

११.पूजावसर संहिता आणि अभ्यास (शोधप्रबंध) डॉ. म. सोनपेठकर महानुभाव, नागपूर२०२२ पृ.२२४

१२.पूजावसर संहिता आणि अभ्यास (शोधप्रबंध) डॉ. म. सोनपेठकर महानुभाव, नागपूर२०२२ पृ.२४४

***

संस्कृत भाषेचे ज्ञान आणि तंत्रयुक्ती - आयुर्वेद भाषांतरणाचे स्तंभ

डॉ. प्रगती वाघमारे
प्राध्यापक व विभागप्रमुख
संहिता सिद्धांत विभाग
भाऊसाहेब मुळक आयुर्वेद कॉलेज बुटीबोरी नागपूर

सारांश

संस्कृत भाषा भारतीय ज्ञानाचा पाया आहे. सगळीच भारतीय मौलिक ग्रंथसंपदा संस्कृत भाषेत विरचित आहे.संस्कृत भाषेचे ज्ञान व्याकरण,छंद,वृत्त,शब्दांची पर्यायी नावे यांसह असणे भाषांतर कार्यातील खरे गमक आहे. अत्यंत कलात्मक पद्धतीने, व्याकरणाने बांधलेली ही भाषा मोजक्या शब्दात खूप मोठा अर्थ विशद करते. निरनिराळ्या युक्ती वापरून ही ग्रंथसंपदा आपल्याला समजून घ्यावी लागते. तंत्रयुक्ती हे असेच एक माध्यम आहे ज्या द्वारे आपल्याला शब्दांचा, वाक्यांचा यथार्थ कळतो. तंत्रयुक्ती थोडक्यात खूप मोठा अर्थ विशद करतात. ह्या तंत्रयुक्ती आयुर्वेद ग्रंथांच्या भाषांतरात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. आयुर्वेद हे शास्त्र आहे. शास्त्रीय शब्दांची फोड, त्यांचा दुसऱ्या शब्दांशी संबंध तंत्रयुक्ती द्वारे जाणता येतो. आचार्य चरक आणि वाग्भट 36 तंत्रयुक्ती, आचार्य सुश्रुत 32 तंत्रयुक्ती चे वर्णन करतात. थोडक्यात वर्णित विषयाला विस्तृतपणे मांडणे, वाक्याचा अर्थ समजावणे, वाक्ययोजना, अर्थयोजना हे तंत्रयुक्तीचे प्रयोजन आहे.[1] आयुर्वेदशास्त्रभाषांतर कार्यात तंत्रयुक्ती समजून भाषांतर करणे अधिक सयुक्तिक ठरते.

उद्दिष्ट

आजच्या अत्यंत गतीमान युगात जेव्हा आपण आजपासून हजार वर्षांपूर्वी सूत्रबद्ध झालेल्या आयुर्वेद ग्रंथांच्या भाषांतराचा विचार करतो तेव्हा त्या ग्रंथांची भाषा सखोलपणे ज्ञात असणं ही भाषांतराची प्राथमिकता ठरते. तसेच शास्त्रज्ञानाचे उपाय असलेल्या तंत्रयुक्तीचा उपयोग करून ते भाषांतर करणे अपेक्षित आणि सटीक असते. आयुर्वेदग्रंथभाषांतराच्या दृष्टीने संस्कृत भाषेचे ज्ञान आणि तंत्रयुक्ती यांचे अध्ययन हा या शोधनिबंधाचे उद्दिष्ट आहे.

शोधपद्धती

सदर शोधनिबंधात माहिती संकलन उपलब्ध साहित्याचा आढावा (बृहत् त्रयी आणि तंत्रयुक्ती वरील इतर संशोधने) या पद्धतीने करण्यात आले आहे.

प्रस्तावना

आयुष: वेद: इति आयुर्वेद:|

आयुष्याकरिता हितकारक, अहितकारक, सुखकारक ,दुःखकारक काय या सगळ्या बाबींचा विचार आयुर्वेदात केला जातो.[2] अथर्ववेदाचा आयुर्वेद हा उपवेद आहे. आजपासून हजारो वर्षांपूर्वी आयुर्वेद सांगितल्या गेला ,स्मरला गेला, लिहिल्या गेला आणि चिकित्सेकरिता उपयुक्त ही झाला . हजारो वर्षांपूर्वी सांगितलेल्या आयुर्वेदातील स्वास्थ्य रक्षण आणि चिकित्सा पद्धती आजही तितक्याच प्रभावी आणि सुयोग्य दिसून येतात. अनेक संशोधनाद्वारे हे सिद्ध झालेले आहे. आयुर्वेदाचे मुख्य ग्रंथ संस्कृत भाषेमधून लिहिल्या गेलेले आहेत. हे सगळे प्राचीन ग्रंथवैभव भाषेच्या माध्यमातून समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते, कारण जशी प्रत्येक बारा मैलावर भाषा बदलते त्याचप्रमाणे काळाचाही भाषेवर अतिशय प्रभाव पडतो. जसे उपनिषद काळात सुरू झालेली चरक संहिता इसवी सन दुसऱ्या शतकापर्यंत आणि सुश्रुत संहिता पुढे सहाव्या शतकापर्यंतही लिहिल्या गेली. तेव्हा निश्चितच भाषा, भाषेची पद्धत, भाषेतील शब्द ,शब्दांचे अर्थ बदलणं खूपच स्वाभाविक आहे. या संहितांचा भाषेच्या दृष्टीने जेव्हा आपण विचार करतो तेव्हा आपल्याला स्पष्टपणे उपनिषदकालीन भाषा व पुढच्या संग्रहादी काळातील भाषा वेगवेगळ्या दिसून येतात. भाषा संस्कृतच आहे पण त्यातील शब्दवैभव, लालित्य, वेगवेगळ्या रीतींनी स्पष्ट होण्याची पद्धत आपल्याला या संहिता ग्रंथांमधून दिसून येते. तंत्रयुक्ती वापरुन विषय मांडण्याची पद्धत आयुर्वेद शास्त्र ग्रंथाची विशेषता आहे. या तंत्रयुक्ती समजून घेणे हा स्वतंत्र अध्ययनाचा विषय आहे.

भाषांतरणाची गरज

आजच्या एकविसाव्या शतकात आयुर्वेदिय ग्रंथांचे अध्ययन करीत असताना बऱ्याचदा संस्कृत भाषेच्या ज्ञाना अभावी मूळ ग्रंथाचे भाषांतर वाचावे लागते. एक तर संस्कृत ग्रंथांचे भाषांतर उपलब्ध नसते किंवा असल्यास त्या भाषांतरित पुस्तकांमध्ये मूळ श्लोकाचा अर्थ बदलल्याचे दिसून येते.मूळ रचनाकाराला कोणता अर्थ अपेक्षित आहे हे समजून घेऊन भाषांतर करणे अत्यंत जिकिरीचे काम आहे. त्यामुळे आयुर्वेदिय ग्रंथांचे भाषांतर वाचत असताना मूळ संस्कृत भाषेत असलेल्या लिखाणाकडे विशेषत्वाने लक्ष देण्याची गरज पडते. मूळ अर्थाला धक्का न लागता अर्थपूर्ण भाषांतर करणे हे कार्यही मूळ रचनाकारा इतकेच महत्त्वाचे आहे. आयुर्वेद शास्त्रासमोरचे भाषांतरण हे सगळ्यात मोठे आव्हान आहे कारण जसजसे आपण वेगाने नवीन युगात प्रवेश करीत आहोत तसतसे संस्कृत मधील शब्दांचे तत्कालीन परिस्थितीत आणि एकूणच सामाजिक, भौगोलिक, आर्थिक, राजनैतिक दृष्टीने होणारे बदल समजून घेऊन भाषांतर करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते आणि हाच आयुर्वेद शास्त्रासमोरचा सगळ्यात मोठा प्रश्न आहे.

शास्त्र ज्ञानोपाय

शास्त्रज्ञानोपाय अंतर्गत तीन पद्धती आयुर्वेदाने स्वीकारल्या आहेत. अध्ययन,अध्यापन आणि तद्विदसंभाषा. अध्ययन म्हणजे स्वतः अभ्यास करणे, अध्यापन म्हणजे दुसऱ्याला ती गोष्ट शिकवणे आणि तद्विदसंभाषा म्हणजे सज्जनांच्या संभाषेमधून ज्ञानग्रहण करणे. या संभाषेमध्ये एकूण चौरेचाळीस वाद मार्गपदे सांगितलेली आहेत.[3] ही वादमार्गपदे वादात प्रतिपक्षाच्या मताचे खंडन आणि आपले मत प्रस्थापित करण्याकरिता उपयोगात आणण्याकरिता सांगितलेली आहेत पण प्रस्तुत अध्ययनात आयुर्वेदिक ग्रंथांच्या भाषांतरातही ही वादमार्गपदे निश्चितपणे उपयुक्त आहेत. जसे सव्यभिचार नावाचा एक वाद मार्ग आहे ज्याचा अर्थ निश्चितपणे कोणतीही एक बात न सांगणे असा होतो. संशय, अनुयोज्य, वाक्य दोष जसे न्यून ,अधिक, अनर्थक, अपार्थक आणि विरुद्ध. संदेह म्हणजे अनिश्चिती.अनुयोज्य म्हणजे दोषयुक्त वाक्य आणि वाक्य दोष न्यून म्हणजे अभाव. अनर्थक म्हणजे केवळ अक्षर समुदाय.अपार्थक म्हणजे असंबंध आणि विरुद्ध म्हणजे मूळ सिद्धांताच्याच विरुद्ध सांगणे.[4] संस्कृत मधून अन्य भाषांमध्ये साहित्य भाषांतरित करीत असताना या वादमार्ग पदांकडेही लक्ष देणे गरजेचे ठरते.

संस्कृत भाषेचे सखोल ज्ञान

संस्कृत भाषेचे सखोल ज्ञान आणि ज्या भाषेत भाषांतरण करायचे आहे त्याही भाषेचे सखोल ज्ञान भाषांतरकाराला असणे गरजेचे ठरते कारण दोन्ही भाषांमध्ये लीलया विहार करणारी व्यक्तीच भाषांतरणाचे शिवधनुष्य पेलू शकते. संस्कृतचे व्याकरणदृष्ट्या ज्ञान, विशेषतः पद्य साहित्यातील छंदांचे ज्ञान, एकाच शब्दाचे होणारे निरनिराळे अर्थ ,ते शब्दार्थ आणि प्रसंगोचितता भाषांतराचे मूळ स्तंभ आहेत. जसे रज हा शब्द मनाचा दोष या अर्थी वापरला जातो तर स्त्रीमध्ये रज रक्त या अर्थी वापरला जातो.प्रसंगोचित शब्दाचे अर्थ ज्ञान भाषांतरकाराला असणे गरजेचे असते. दोष म्हणत असताना त्यामध्ये त्रिदोषांचाही समावेश होतो आणि शरीरात निर्माण होणाऱ्या व्याधी करीताही दोष शब्द वापरला जातो.

ज्या काळात रचल्या गेलेली संहिता व ग्रंथ आहे त्या काळातील सामाजिक, आर्थिक ,भौगोलिक आणि भाषिक बदलही भाषांतरकाराने लक्षात घेतले पाहिजेत. जसे भावप्रकाश या लघुत्रयी मधील ग्रंथात फिरंग व्याधीचे वर्णन आढळते. तो व्याधी अगोदरच्या संहितांमध्ये आढळून येत नाही . काळाच्या दृष्टीने भावप्रकाश हा ग्रंथ खूपच अलीकडचा म्हणजे सोळाव्या शतकातील मानला जातो. त्या काळात फिरंग व्याधी चे वर्णन आढळून येते म्हणून भावप्रकाश मध्ये वर्णन आढळते.

विशिष्ट व्याख्या ह्या त्या त्या शास्त्राचे वैशिष्ट्य असतात. आयुर्वेदही त्याला अपवाद नाही. जसे आम म्हणजे हिंदी भाषेत आंबा, संस्कृत मध्ये होकारार्थी. पण आयुर्वेदात मात्र अपक्व आहार रस म्हणजे आम. त्या विशिष्ट व्याख्यांना धक्का लागला तर अर्थाचा अनर्थ होतो.

आयुर्वेद हे शास्त्र आहे. शास्त्रात केवळ भावना पोहचविणे असे अपेक्षित नाही,केवळ तात्पर्यार्थ सांगणे ही नसावे . जसेच्या तसे ज्ञान कुठलीही सरमिसळ न करता दुसऱ्या भाषेत आणणे खरोखरच कठीण काम आहे. शिवाय आयुर्वेद शास्त्रातील महर्षी उत्तम साहित्यिक होते, अलंकारांचा, शब्द पर्यायांचा ते विपुल प्रमाणात उपयोग करीत होते. गेय,प्रासादिक रचना अष्टांग हृदयम सारख्या ग्रंथांची विशेषता आहे. भाषांतरात हा रसभंग करणे अपेक्षित नाही.

तंत्रयुक्ती

आयुर्वेद शास्त्र समजून घेण्याकरिता इतर शास्त्रांप्रमाणेच तंत्रयुक्तींचा उपयोग करायला आचार्य सांगतात. चरकाचार्यांनी ३६ तंत्रयुक्ती सांगितल्या आहेत. भाषांतरं करीत असताना मूळ संहिता समजून घेण्याकरिता या तंत्रयुक्तींचा वापर अत्यंत मोलाचा ठरतो. त्या तंत्रयुक्ती खालील प्रमाणे

अधिकरण, योग, हेत्वार्थ, पदार्थ,प्रदेश,उद्देश,निर्देश,वाक्यशेष ,प्रयोजन,उपदेश,अपदेश, अतिदेश, अर्थापत्ती, निर्णय, प्रसंग, एकांत,अनेकांत, अपवर्ग, विपर्यय,पूर्वपक्ष, विधान, अनुमत, व्याख्यान,संशय, अती तावेक्षण , अनागतावेक्षा ,स्वसंज्ञा , उह्य, समुच्चय,निदर्शन, निर्वचन, नियोग, विकल्पना, प्रत्युत्सार, उद्धार,संभव. खालील तंत्रयुक्ति विशेषत्वाने महत्त्वाच्या ठरतात.[5]

१. अधिकरण शास्त्र किंवा विषय कशावर आधारित आहे हे अधिकरण सुचवते.

२. योग शास्त्र स्पष्ट करण्याकरिता प्रतिज्ञा,हेतू, उदाहरण,उपनय, निगमन या पंच अवयवी वाक्यांची गरज भासते. यांना क्रमाने समजून घेतले तर सिद्धांत स्पष्ट होतो.

३. हेत्वार्थ म्हणजे उदाहरणे देऊन विषय स्पष्ट करणे. भाषांतरात नेमके उदाहरण देऊन विषय स्पष्ट होतो.

४. पदार्थ म्हणजे शब्दांचे नेमके अर्थ.

५. वाक्यशेष म्हणजे वाक्य पूर्ण न करता अर्थ सूचित करणे. जसे मधुर,अम्ल, लवण रस वाताचे शमन करतात तर ते अनुषंगाने कफाचे वर्धन करतात.

निष्कर्ष

संस्कृत साहित्य, व्याकरण, आयुर्वेद शास्त्र, वादमार्ग पदे, तंत्रयुक्ती यांचा वापर करून निश्चितपणे यथार्थ भाषांतर करता येऊ शकेल. भाषांतर करीत असताना मूळ विषयाला धक्का न लागता जसेच्या तसे भाषांतर होणे अपेक्षित असते. अर्थ न बदलता केलेले भाषांतर उत्कृष्ट मानले जाते. शास्त्र विषयाचे भाषांतर भाषांतरकाराला विशेष अवधान देऊन करणे अपेक्षित असते. वाक्याची आकांक्षा, योग्यता, सन्निधी आणि तात्पर्य समोर ठेऊन भाषांतर करावे लागते. त्याकरिता संस्कृत भाषा आणि तंत्रयुक्ती यांचे अनन्य साधारण महत्त्व आहे.

संदर्भ ग्रंथसूची

1. चरक संहिता सिद्धिस्थान अध्याय 12 /48
2. चरक संहिता सूत्रस्थान अध्याय 1/41
3. चरक संहिता विमान स्थान अध्याय 8/27
4. चरक संहिता विमान स्थानअध्याय 8 /27
5. चरक संहिता सिद्धिस्थान अध्याय 12/44

***

ज्योतिष ग्रंथांमध्ये अनुवादाचे महत्त्व

शोधार्थी
सौ.दिपाली आनंद देशपांडे
मार्गदर्शक
डॉ. कृष्णकुमार पांडेय
प्रमुख-प्राचीन विज्ञान आणि मानव्यशास्त्र संकाय
वेदांग ज्योतिष विभाग
क.का.सं.वि., रामटेक.

सारांश

ज्योतिष्य शास्त्र हे प्राचीन भारतीय परंपरेतील एक महत्त्वाचे अंग आहे. वेदांपासून सुरू झालेली ही विद्या अनेक ग्रंथांमध्ये विस्तारली असून ती संस्कृत, प्राकृत, पालि आणि इतर प्राचीन भाषांमध्ये लिहिलेली आहे. या ग्रंथांचा अनुवाद केल्यामुळे आधुनिक काळात ज्योतिष्यशास्त्र अधिक सुलभ उपलब्ध होऊ शकते. बहुतेक प्राचीन ज्योतिष्य ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिलेले आहेत,जे सर्वसामान्यांसाठी सहज समजण्यास कठीण आहे. त्यामुळे या ग्रंथांचे हिंदी,मराठी, इंग्रजी आणि इतर भाषांमध्ये अनुवाद केल्यास सर्वसामान्यांना हे ज्ञान अधिक सोपे होईल. अनुवाद हा ज्योतिषशास्त्राच्या ज्ञानाचा प्रसाराकरिता आणि जागतिकस्तरावर त्याचा स्वीकार होण्यासाठी आवश्यक आहे.विविध भाषांतील अभ्यासकांना ज्योतिषशास्त्र समजावून घेण्यास सोपे व्हावे तसेच सांस्कृतिक देवाण-घेवाण होण्यासाठी आवश्यक आहे, पद्धतींचे आदान-प्रदान व पारंपरिक ज्ञानाचा आधुनिक संशोधनाशी समन्वय असता उत्तमरित्या ज्योतिष ग्रंथांचा विकास समजुन घेता येईल. अनुवाद केल्याने नवीन अभ्यासक आणि ज्योतिष्यविद्येची आवड असलेल्यांना हे ग्रंथ समजणे सोपे होते.ज्योतिष्य शास्त्र हे भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. त्यातील सिद्धांत, गणितीय सूत्रे आणि फलज्योतिष्याचे तत्त्वज्ञान हे अनुवादाच्या माध्यमातून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचू शकते.जर हे ग्रंथ फक्त मूळ भाषेतच राहिले, तर काळानुसार त्यांचा अभ्यास करणारे लोक कमी होतील आणि ही अमूल्य विद्या लुप्त होण्याची शक्यता असेल. अनुवादाच्या मदतीने या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विविध भाषिक लोकांना ज्ञान मिळू शकते. पारंपारिक ज्योतिषशास्त्र भारतातील राज्यनिहाय विविधतेत तामिळ ज्योतिष, बंगाली ज्योतिष, गुजराती ज्योतिष इत्यादिप्रकारे आहेत. पाश्चात्य देशांमध्ये ज्योतिषाचा प्रभाव ग्रीक, रोमन आणि इस्लामी ज्योतिष जास्त आहे. विविध देशांतील संस्कृतीनुसार ज्योतिषशास्त्रातील बदल त्यांचे अनुवाद आहेत. विविध भाषांमध्ये उपलब्ध ग्रंथ आणि त्यांचा

अभ्यास अनुवादामुळे सहज शक्य होते.**ज्योतिषग्रंथांच्या अनुवाद करतांना अनेक आव्हाने आहेत** जसे की शब्दशः अनुवादामध्ये शब्दांचा अर्थ हरवणे,भावार्थ अनुवादात मूळ संकल्पना गहाळ होणे,विशेष ज्योतिषीय संकल्पनांचे भाषांतर करताना अर्थाचा गोंधळ होणे त्यामुळे मुळ ग्रंथाचा उद्देश नाहिसा होतो. वैदिक संकल्पना, मंत्र, श्लोक यांचा प्रभावी अनुवाद करणे कठीण आहे कारण त्यासाठी त्या भाषेवर लेखकाचे प्रभुत्व असणे गरजेचे आहे यासाठी पारंपारिक तत्त्वे आणि विज्ञानातील आधुनिक दृष्टिकोन यांचा समन्वय आवश्यक होय.कधी कधी पारंपारिक शब्दांना आधुनिक भाषेत समर्पक शब्द न मिळणे हि समस्या लेखकासमोर असते त्यावेळी अनुवाद करणे अवघड वाटु शकते .

प्रस्तावना

अनुवाद म्हणजे मूळ भाषेतील विचार दुसऱ्या भाषेत मांडणे. ज्योतिषशास्त्रातील अनुवाद केवळ शब्दशः नसतो; तर तो भावार्थाने करणे आवश्यक असते. मूळ ग्रंथातील गहन तत्त्वे आणि संकल्पना दुसऱ्या भाषेत कशा प्रकारे प्रभावीपणे मांडता येतील, हे आव्हानात्मक असते.

अनुवाद हा ज्योतिषशास्त्राच्या ज्ञानाचा प्रसाराकरिता आणि जागतिकस्तरावर त्याचा स्वीकार होण्यासाठी आवश्यक आहे.विविध भाषांतील अभ्यासकांना ज्योतिषशास्त्र समजावून घेण्यास सोपे व्हावे तसेच सांस्कृतिक देवाण-घेवाण होण्यासाठी आवश्यक आहे, पद्धतींचे आदान-प्रदान व पारंपरिक ज्ञानाचा आधुनिक संशोधनाशी समन्वय असता उत्तमरित्या ज्योतिष ग्रंथांचा विकास समजुन घेता येईल.

प्राचीन संस्कृत ग्रंथ तसेच वेदांमध्ये 'ज्योतिष' हा एक स्वतंत्र विषय मानला गेला आहे. 'वेदांग ज्योतिष' हा पहिला ज्ञात ग्रंथ आहे ज्यामध्ये कालगणना आणि खगोलशास्त्राचा समावेश आहे. संस्कृतमधील 'वराहमिहिरा' यांचा 'बृहत्संहिता' आणि आर्यभटांचे 'आर्यभट्टीय' या ग्रंथांचे अनुवाद विविध भाषांमध्ये झाले आहेत.पारंपारिक ज्योतिषशास्त्र भारतातील राज्यनिहाय विविधतेत तामिळ ज्योतिष, बंगाली ज्योतिष, गुजराती ज्योतिष इत्यादिप्रकारे आहेत. पाश्चात्य देशांमध्ये ज्योतिषाचा प्रभाव ग्रीक, रोमन आणि इस्लामी ज्योतिष जास्त आहे. विविध देशांतील संस्कृतीनुसार ज्योतिषशास्त्रातील बदल त्यांचे अनुवाद आहेत. विविध भाषांमध्ये उपलब्ध ग्रंथ आणि त्यांचा अभ्यास अनुवादामुळे सहज शक्य होतो.

ज्योतिषशास्त्र हे प्राचीन भारतीय परंपरेतील एक महत्त्वाचे अंग आहे. वेदांपासून सुरू झालेली ही विद्या अनेक ग्रंथांमध्ये विस्तारली असून ती संस्कृत, प्राकृत, पालि आणि इतर प्राचीन भाषांमध्ये लिहिलेली आहे. या ग्रंथांचा अनुवाद केल्यामुळे आधुनिक काळात ज्योतिष्य शास्त्र अधिक सुलभ आणि व्यापकपणे उपलब्ध होऊ शकते. बहुतेक प्राचीन ज्योतिष्य ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिलेले आहेत, जी सर्वसामान्यांसाठी सहज समजण्यास कठीण आहे. त्यामुळे, या ग्रंथांचे हिंदी, मराठी, इंग्रजी आणि इतर भाषांमध्ये अनुवाद केल्यास सर्वसामान्यांना हे ज्ञान अधिक सोपे होईल.उदाहरणार्थ, 'बृहद्जातक',

'जातकपरिजात', 'फलदीपिका', आणि 'बृहत्संहिता' हे महत्त्वाचे ज्योतिष्य ग्रंथ संस्कृतमध्ये आहेत. त्यांचा अनुवाद केल्याने नवीन अभ्यासक आणि ज्योतिषविद्येची आवड असलेल्यांना हे ग्रंथ समजणे सोपे होते.ज्योतिष्य शास्त्र हे भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. त्यातील सिद्धांत, गणितीय सूत्रे आणि फलज्योतिष्याचे तत्त्वज्ञान हे अनुवादाच्या माध्यमातून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचू शकते.जर हे ग्रंथ फक्त मूळ भाषेतच राहिले, तर काळानुसार त्यांचा अभ्यास करणारे लोक कमी होतील आणि ही अमूल्य विद्या लुप्त होण्याची शक्यता असेल. अनुवादाच्या मदतीने या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विविध भाषिक लोकांना ज्ञान मिळू शकते. आजच्या काळात अनेक संशोधक आणि अभ्यासक ज्योतिष्य शास्त्राचा सखोल अभ्यास करत आहेत. मात्र, जर ते फक्त संस्कृत किंवा प्राचीन भाषांमध्ये उपलब्ध असेल, तर अभ्यासकांना त्याचा अभ्यास करणे कठीण जाईल.उदाहरणार्थ, आधुनिक गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ जर प्राचीन भारतीय खगोलशास्त्र (Jyotisha) समजून घेऊ इच्छित असतील, तर त्यांना त्याचा अनुवादित स्रोत उपलब्ध असणे आवश्यक आहे.

उदा:- **फलदिपिका** या ग्रंथात राशीयोके स्वरुप यामध्ये

भौम:शुक्रबुधेंदु सुर्यशशिजा: शुक्रारजीवार्कजा:
मंदौ देवगुरु: क्रमेण कथिता: मेषादिराशीश्वरा:।

सूर्यादुच्चगृहा: क्रियो वृषमृगस्त्री कर्कि मीनास्तुला
दिक् ष्यंशैर्मनुयुक्तिथीशुभनखांशैस्तेऽस्तनीचा: क्रमात् [1]॥

मेष आणि वृश्चिक राशींचा स्वामी मंगळ आहे.वृषभ आणि तुला राशींचा स्वामी शुक्र आहे. मिथुन आणि कन्या राशींचा स्वामी बुध आहे.धनु आणि मीन राशींचा स्वामी गुरु आहे. तसेच मकर आणि कुम्भेचा स्वामी शनी आहे.सिंह राशीचा स्वामी सुर्य आहे. कर्क राशीचा स्वामी चंद्र आहे. **सुर्य** मेषेत १० अंशावर उच्चीचा तर तुलेत १० अंशावर नीचीचा असतो. **चंद्र** वृषभेचा ३ अंशावर उच्च असतो तर वृश्चिकेत ३ अंशावर नीचीचा असतो.मंगळ मकरेत २८ अंशावर उच्ची चा तर कर्केत २८ अंशावर नीचीचा असतो.**बुध** कन्येत १५ अंशावर उच्चीचा असतो तर मीनेत १५ अंशावर नीचीचा असतो.**गुरु** कर्केत ५अंशावर उच्चीचा असतो तर मकरेत ५अंशावर नीचीचा असतो.**शुक्र** मीनेत २७अंशावर उच्चीचा असतो तर कन्येत २७अंशावर नीचीचा असतो.**शनी** तुलेत २०अंशावर उच्च असतो तर मेषेत २० अंशावर नीचीचा असतो.

भारतीय ज्योतिषशास्त्र विविध भागांमध्ये विकसित झाले आहे, जसे की,पारंपरिक वैदिक ज्योतिष,नाडीज्योतिष,दक्षिण भारतीय आणि उत्तर भारतीय ज्योतिष हे विविध प्रकार वेगवेगळ्या ग्रंथांमध्ये आढळतात. जर हे ग्रंथ वेगवेगळ्या भाषांमध्ये उपलब्ध असतील, तर त्यांची तुलना करून संशोधन करणे सोपे जाते.जागतिक पातळीवर ज्योतिषशास्त्राचे महत्त्व वाढले आहे.अनेक ज्योतिष्य

[1] फलदिपिका,मंत्रेश्वर,अनुवाद नंद्किशोर बढे, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ,रामटेक,2022

तज्ज्ञ,ज्योतिष सल्लागार आणि विद्यार्थी या विद्या शिकतात आणि त्याचा उपयोग करतात. जर अनुवादित ग्रंथ सहज उपलब्ध असतील, तर ते ज्योतिषशास्त्राच्या व्यावसायिक वापरासाठी उपयुक्त ठरू शकतात.उदाहरणार्थ, जर एखाद्या व्यक्तीला केवळ इंग्रजी किंवा हिंदी समजत असेल, तर ती संस्कृत ग्रंथांचा अभ्यास करू शकणार नाही.अनुवादामुळे तिला मूळ संकल्पना समजून घेता येतील जागतिक स्तरावर भारतीय ज्योतिषचा प्रसार होण्यासाठी मदत होईल.भारतीय ज्योतिषशास्त्राबद्दल पाश्चात्य जगातही मोठी उत्सुकता आहे. परंतु, हे ग्रंथ फक्त संस्कृतमध्ये असल्यामुळे परदेशी अभ्यासकांना ते समजणे कठीण जाते. जर हे ग्रंथ इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश यांसारख्या आंतरराष्ट्रीय भाषांमध्ये अनुवादित केले गेले, तर त्याचा प्रसार जागतिक स्तरावर होऊ शकतो.

उदाहरणार्थ, 'सूर्यसिद्धांत', जो प्राचीन खगोलशास्त्रावर आधारित ग्रंथ आहे, तो इंग्रजीत अनुवादित झाल्यानंतर जगभरातील वैज्ञानिकांनी त्याचा अभ्यास केला.पारंपरिक आणि आधुनिक ज्ञानाचा संगम होईल आणि भारतीय ज्ञान परंपरेचा जगाला उपयोग होईल तसेच ज्योतिष ग्रंथांचा योग्य प्रकारे अनुवाद झाला, तर पारंपरिक ज्ञान आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीकोनातून तपासता येईल.उदाहरणार्थ, प्राचीन ग्रंथांमध्ये ग्रहांचे प्रभाव आणि त्यांचे गणितीय आकलन दिलेले आहे. जर ते आधुनिक भाषेत स्पष्ट केले गेले, तर खगोलशास्त्र आणि ज्योतिष यांच्यातील संबंध अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येईल.

ज्योतिषग्रंथांच्या अनुवाद करतांना अनेक आव्हाने आहेत जसे की शब्दशः अनुवादामध्ये शब्दांचा अर्थ हरवणे,भावार्थ अनुवादात मूळ संकल्पना गहाळ होणे,विशेष ज्योतिषीय संकल्पनांचे भाषांतर करताना अर्थाचा गोंधळ होणे त्यामुळे मुळ ग्रंथाचा उद्देश नाहिसा होतो. वैदिक संकल्पना, मंत्र, श्लोक यांचा प्रभावी अनुवाद करणे कठीण आहे कारण त्यासाठी त्या भाषेवर लेखकाचे प्रभुत्व असणे गरजेचे आहे यासाठी पारंपारिक तत्त्वे आणि विज्ञानातील आधुनिक दृष्टिकोन यांचा समन्वय आवश्यक होय.कधी कधी पारंपारिक शब्दांना आधुनिक भाषेत समर्पक शब्द न मिळणे हि समस्या लेखकासमोर असते त्यावेळी अनुवाद करणे अवघड वाटु शकते .

निष्कर्ष

ज्योतिष ग्रंथांचा अनुवाद करणे हे केवळ भाषांतर नाही, तर तो एक सांस्कृतिक आणि बौद्धिक वारसा जतन करण्याचा महत्त्वाचा प्रयत्न आहे. अनुवादामुळे ज्योतिषशास्त्र सर्वसामान्य लोकांसाठी सुलभ होते.अभ्यासक आणि संशोधकांना प्राचीन ज्ञानाचा उपयोग करता येतो. भारतीय ज्योतिष शास्त्राचा चा जागतिक स्तरावर प्रसार होतो.पारंपरिक आणि आधुनिक ज्ञानाचा संगम साधता येतो.त्यामुळे, भविष्यात ज्योतिष ग्रंथांचे अधिक प्रमाणात अनुवाद होणे अत्यंत आवश्यक आहे.पारंपारिक ज्ञानाचा आधुनिक विज्ञानाशी संबंध जोडण्यासाठी अनुवादाचा वापर केला जाऊ शकतो.

विविध संस्कृतींमधील तत्त्वज्ञानाचे आदान-प्रदान सहज साध्य होईल.नवनवीन संशोधन आणि त्याचा अनुवादातील वापर व विज्ञानाच्या प्रकाशात ज्योतिषशास्त्राचे पुनर्मूल्यांकन साध्य करता येईल.आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने संशोधनाचे अनुवाद करित असतांना वेळेची बचत होईल. आधुनिक तंत्रज्ञानाशी समन्वय तसेच AI, मशीन लर्निंग आणि संगणकीय अनुवादाच्या सहाय्याने अनुवादाची प्रक्रिया सुकर झाली आहे त्यासाठी AI आधारित अनुवाद, Google Translate, DeepL इत्यादींचा वापर केल्यास अधिक लवकर होईल .मॅन्युअल अनुवादाची आवश्यकता आणि पारंपारिक भाषातज्ञांची भूमिकाहि अतिशय महत्वाची आहे कारण मशिन शिवाय अनुवाद करीत असतांना प्रमाणभूत अनुवादाचे नियम आणि त्यांचे पालन केल्या जाईल. अनुवादामुळे ज्योतिषशास्त्राचे जागतिकीकरण झाले. विविध भाषा आणि संस्कृतींना समजावून घेण्यासाठी अनुवादाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

संदर्भग्रंथसूची

फलदिपिका,मंत्रेश्वर,अनुवाद नंद्किशोर बढे, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, 2022.

* * *

भारतीय साहित्य आणि अनुवाद : एक चिकित्सक अभ्यास

संशोधक
सचिन भीमराव चव्हाण
पदव्यूत्तर शिक्षण शास्त्र विभाग,
क.का.सं.वि., रामटेक

मार्गदर्शक
डॉ.राजश्री मेश्राम
सहयोगी प्राध्यापक, पदव्युत्तर शिक्षण शास्त्र विभाग,
क.का.सं.वि., रामटेक

सारांश

भारतीय साहित्य हे बहुभाषिक, बहुसांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेतून विकसित झालेले असून त्याची व्याप्ती अत्यंत विस्तृत आहे. या संशोधनाचा उद्देश भारतीय साहित्याच्या विकासामध्ये अनुवादाची भूमिका, त्यातील सैद्धांतिक आधार, व्यावहारिक आव्हाने आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव यांचा चिकित्सक अभ्यास करणे हा आहे. संशोधनासाठी गुणात्मक पद्धतीचा अवलंब करून विविध ग्रंथ, संशोधन लेख आणि अनुवादशास्त्रातील प्रमुख सिद्धांतांचा अभ्यास करण्यात आला आहे. Bassnett (2002) यांच्या मते, अनुवाद ही केवळ भाषिक प्रक्रिया नसून सांस्कृतिक देवाणघेवाणीची प्रक्रिया आहे. या अभ्यासातून असे स्पष्ट होते की, भारतीय साहित्याच्या जागतिक प्रसारासाठी आणि सांस्कृतिक संवादासाठी अनुवाद अत्यंत महत्त्वपूर्ण माध्यम आहे. मात्र, भाषिक अचूकता, सांस्कृतिक संदर्भ, शैली आणि भावनिकता जपणे ही अनुवाद प्रक्रियेमधील प्रमुख आव्हाने आहेत.

प्रस्तावना

भारतीय साहित्याची परंपरा अत्यंत समृद्ध आणि वैविध्यपूर्ण आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत विविध भाषांमध्ये निर्माण झालेल्या साहित्यामुळे भारताची सांस्कृतिक विविधता प्रतिबिंबित होते. भारतीय साहित्याचा अभ्यास केवळ एका भाषेपुरता मर्यादित नसून तो बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक स्वरूपाचा आहे.

अनुवाद हा या साहित्याला परस्पर जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. Bassnett (2002) यांच्या मते, “अनुवाद ही एक पुनर्रचना प्रक्रिया आहे जी एका संस्कृतीला दुसऱ्या संस्कृतीशी जोडते.” त्यामुळे

अनुवादाचा अभ्यास केवळ भाषिक न राहता सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून करणे आवश्यक आहे.

भारतीय साहित्याची बहुभाषिक परंपरा

भारतीय साहित्याचा इतिहास पाहिला असता, त्याची मुळे संस्कृत, प्राकृत, पालि आणि अपभ्रंश या भाषांमध्ये आढळतात. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत यांसारख्या ग्रंथांचे विविध भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले, ज्यामुळे ते सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचले.

ज्ञानेश्वरांनी 'भगवद्गीता'चे मराठीत भाषांतर करून 'ज्ञानेश्वरी' तयार केली, जे भारतीय अनुवाद परंपरेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. Ramakrishnan (2010) यांच्या मते, भारतीय साहित्याची खरी ओळख ही त्याच्या अनुवादपरंपरेतूनच स्पष्ट होते.

मुघल काळात फारसी भाषेचा प्रभाव वाढला आणि उपनिषदांचे फारसीत अनुवाद झाले. ब्रिटिश काळात इंग्रजी माध्यमातून भारतीय साहित्य जागतिक स्तरावर पोहोचले (Trivedi, 2006).

अनुवाद आणि आधुनिक भारतीय साहित्य

आधुनिक काळात अनुवादामुळे भारतीय साहित्याची व्याप्ती अधिक व्यापक झाली आहे. विविध भाषांतील साहित्य एकमेकांत अनुवादित होऊन सांस्कृतिक संवाद घडून येतो.

Rabindranath Tagore यांच्या Gitanjali च्या इंग्रजी अनुवादामुळे त्यांना 1913 साली नोबेल पारितोषिक मिळाले, ज्यामुळे भारतीय साहित्य जागतिक पटलावर पोहोचले. Mukherjee (1994) यांच्या मते, अनुवादामुळे साहित्य नवीन अर्थ आणि संदर्भ प्राप्त करते.

याशिवाय, मराठी, हिंदी, बंगाली, तमिळ, कन्नड साहित्य एकमेकांत अनुवादित होऊन भारतीय साहित्य समृद्ध झाले आहे.

अनुवादाचे स्वरूप आणि सैद्धांतिक आधार

अनुवाद ही केवळ शब्दांची देवाणघेवाण नसून अर्थ, भावना आणि संस्कृती यांचे पुनर्रचनात्मक रूपांतर आहे.

उद्दिष्टे

- भारतीय साहित्याच्या बहुभाषिक स्वरूपाचा सखोल अभ्यास करणे.
- भारतीय साहित्याच्या विकासात अनुवादाची भूमिका स्पष्ट करणे.
- अनुवाद प्रक्रियेमधील सैद्धांतिक दृष्टिकोनांचा अभ्यास करणे.
- अनुवादातील प्रमुख आव्हानांचे विश्लेषण करणे.

- आधुनिक तंत्रज्ञानाचा अनुवाद प्रक्रियेवर होणारा प्रभाव तपासणे.
- भारतीय साहित्याच्या जागतिक प्रसारात अनुवादाचे योगदान अधोरेखित करणे.

संशोधन पद्धती

या संशोधनात गुणात्मक (Qualitative Research Method) पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. द्वितीयक स्त्रोतांवर आधारित विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पद्धती (Analytical and Descriptive Method) अवलंबण्यात आली आहे. विविध साहित्यकृती, संशोधन लेख, आणि अनुवादशास्त्रातील सिद्धांतांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

या अभ्यासामध्ये खालील सिद्धांतांचा वापर करण्यात आला आहे:

Nida (1964) यांचा Dynamic Equivalence Theory

Venuti (1995) यांचा Domestication आणि Foreignization सिद्धांत

Bassnett (2002) यांचा सांस्कृतिक अनुवाद दृष्टिकोन

या सिद्धांतांच्या आधारे भारतीय साहित्याच्या अनुवादाचे चिकित्सक विश्लेषण करण्यात आले आहे.

प्रमुख सिद्धांत

1. Dynamic Equivalence (Nida, 1964)
या सिद्धांतानुसार, अनुवादाचा उद्देश वाचकांवर मूळसारखा प्रभाव निर्माण करणे हा असतो.

2. Domestication आणि Foreignization (Venuti, 1995)
Domestication – स्थानिक संस्कृतीशी जुळवून घेणे
Foreignization – मूळ संस्कृतीचे जतन करणे

3. Cultural Translation (Bassnett, 2002)
अनुवाद हा सांस्कृतिक देवाणघेवाणीचा एक भाग आहे.

अनुवादातील आव्हाने

अनुवाद करताना अनेक व्यावहारिक अडचणी येतात:

1. भाषिक अचूकता
मूळ भाषेतील शब्दांचा अचूक अर्थ दुसऱ्या भाषेत देणे कठीण असते (Nida, 1964).

2. सांस्कृतिक संदर्भ

प्रत्येक भाषेमध्ये विशिष्ट सांस्कृतिक संकल्पना असतात. त्या दुसऱ्या भाषेत तितक्याच प्रभावीपणे मांडणे कठीण असते (Simon, 1996).

3. शैली आणि लय

कविता आणि साहित्यिक लेखनात मूळ लय आणि शैली जपणे मोठे आव्हान असते.

4. भावनिकता

लेखकाच्या भावना आणि विचार अचूकपणे व्यक्त करणे आवश्यक असते.

5. अनुवादकाची भूमिका

Venuti (1995) यांच्या मते, अनुवादक अनेकदा "अदृश्य" असतो, परंतु त्याचा प्रभाव अत्यंत महत्त्वाचा असतो.

भारतीय साहित्याचा जागतिक प्रसार

अनुवादामुळे भारतीय साहित्य जागतिक स्तरावर पोहोचले आहे. Arundhati Roy, Salman Rushdie, R. K. Narayan यांसारख्या लेखकांनी जागतिक साहित्यामध्ये महत्त्वपूर्ण स्थान मिळवले आहे.

Tymoczko (2007) यांच्या मते, अनुवादामुळे स्थानिक साहित्य जागतिक संदर्भात समजले जाते.

तसेच, परदेशी साहित्य भारतीय भाषांमध्ये अनुवादित झाल्यामुळे भारतीय वाचकांना नवीन दृष्टिकोन मिळतो.

तंत्रज्ञान आणि अनुवाद

आधुनिक काळात तंत्रज्ञानामुळे अनुवाद प्रक्रियेत मोठे बदल झाले आहेत. Google Translate, AI आधारित साधने, DeepL यांसारख्या प्रणालींमुळे अनुवाद जलद आणि सुलभ झाला आहे.

मात्र, Zethsen (2009) यांच्या मते, मशीन अनुवादामध्ये मानवी भावनिकता आणि सांस्कृतिक संदर्भांची अचूकता कमी असते.

त्यामुळे, भविष्यात मानव आणि यंत्र यांचे संयोजन (Human-AI Collaboration) अधिक प्रभावी ठरणार आहे.

उपसंहार

या संशोधनाच्या आधारे पुढील निष्कर्ष काढता येतात:

- भारतीय साहित्याची बहुभाषिक परंपरा अनुवादामुळे अधिक समृद्ध झाली आहे. (उद्दिष्ट 1, 2)

- अनुवाद प्रक्रियेमध्ये विविध सैद्धांतिक दृष्टिकोन महत्त्वाचे ठरतात. (उद्दिष्ट 3)
- भाषिक, सांस्कृतिक आणि भावनिक आव्हाने अनुवादात महत्त्वाची भूमिका बजावतात. (उद्दिष्ट 4)
- आधुनिक तंत्रज्ञानामुळे अनुवाद प्रक्रियेमध्ये गती आली असली तरी गुणवत्ता टिकवण्यासाठी मानवी हस्तक्षेप आवश्यक आहे. (उद्दिष्ट 5)
- अनुवाद हा भारतीय साहित्याच्या जागतिक प्रसारासाठी अत्यावश्यक घटक आहे. (उद्दिष्ट 6)

त्यामुळे, अनुवाद ही केवळ भाषांतर प्रक्रिया नसून ती सांस्कृतिक संवाद आणि ज्ञान प्रसाराचे प्रभावी माध्यम आहे.

संदर्भग्रंथसूची

1.Bassnett, S. (2002). Translation Studies. Routledge. Das

2.B. K. (2005). A Handbook of Translation Studies. Macmillan Gargesh R & Goswami

3. K. K. (2007). Translation and Interpreting. Orient Blackswan Mukherjee

4.S. (1994). Translation as Discovery. Orient Blackswan. Nida

5. E. A. (1964). Toward a Science of Translating. Brill Ramakrishnan

6. E. V. (2010). Locating Indian Literature. Orient Blackswan Robinson

7. D. (1997). Becoming a Translator. Routledge Simon

8. S. (1996). Gender in Translation. Routledge Trivedi

9. H. (2006). Colonial Transactions. Manchester University Press Tymoczko

10. M. (2007). Enlarging Translation. Routledge Venuti

11. L. (1995). The Translator’s Invisibility. Routledge Venuti

12. L. (2012). The Translation Studies Reader Routledge Zethsen

13. K. K. (2009). Article in Across Languages and Cultures Bhattacharya

14. S. (2012). Indian Literature and Translation Sahitya Akademi.

* * *

प्राकृतकथा संस्कृताविष्कार या पुस्तकात प्रतिबिंबित नीतीमूल्येआणि जैनतत्त्वज्ञान

जया सुनील मुंघाटे
संशोधक छात्रा

सारांश

संस्कृत साहित्यात विपुल प्रमाणात कथा साहित्य आहे. कथांच्या माध्यमातून मनोरंजना बरोबरच नीतीतत्व, तत्त्वज्ञान व्यक्त करणे सहज शक्य असते. त्यामुळे अनेक लोकांनी लघुकथा लिहिल्या आहेत. या सर्व लघुकथांमुळे संस्कृत साहित्य समृद्ध झाले आहेत. मूळ संस्कृत कथांसोबत काही विद्वानांनी इतर भाषांमधील कथा संस्कृतात अनुवादित केल्या आहेत. संस्कृत साहित्यात कथा साहित्य अत्यंत महत्त्वाचे मानल्या जाते. संस्कृतात प्राचीन काळापासून कथा साहित्याची निर्मिती करण्यात आली आहे.[1] आजच्या काळात देखील संस्कृतातून कथा रचना केल्या जातात. त्यापैकी एक पुस्तक प्राकृतकथा - संस्कृताविष्कार हे आहे. या पुस्तकात डॉ. राजश्री मोहाडीकर यांच्या प्राकृत भाषेतील वीस कथा डॉ. कांचन मांडे यांनी संस्कृतात अनुवादित केल्या आहेत. या सर्वच कथा अत्यंत मनोरंजक आहेत. या कथांमधील नीतीमूल्ये आणि जैन तत्वज्ञान यांचा विचार प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

बीज शब्द – नीतीमूल्ये , तत्त्वज्ञान , लघुकथा.

प्रस्तावना

अनेक अभ्यासकांनी इतर भाषांमधील कथा संस्कृतात अनुवादित करण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. अनुवाद हे कार्य अत्यंत महत्त्वाचे असते कारण त्यामुळे एका भाषेतील साहित्य अन्य भाषेमध्ये पोहोचते. त्यामुळे त्या त्या भाषेतील साहित्य समृद्ध होते. आणि साहित्याचा आणखी प्रचार होतो. लघुकथा ही आकाराने लघु असलेली एकत्र प्रधान घटना प्रभावितपणे मांडणारी, स्वयंपूर्ण असणारी, गद्यात्मक, पद्यात्मक संमिश्र किंवा क्वचित संवादात्मक , निवेदन शैली रचलेली, निश्चित केलेला उद्देश पूर्ण करणारी व भाव वैविध्यने युक्त असलेली असते लघुकथेच्या विषयाबाबत मात्र बंधन नाही.

डॉ. नंदा पुरी यांनी संस्कृत लघुकथांची सूक्ष्म अध्ययन करून “संस्कृत साहित्यातील लघुकथा’हे पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यात त्यांनी संस्कृत लघुकथांचा सर्वांगाने विचार केला आहे. त्यांचे विचार लक्षात ठेवून काही लघुकथा वाचल्यानंतर प्राकृत कथा संस्कृताविष्कार हे पुस्तक मला अतिशय भावले , आणि त्या ग्रंथातील नीतीतत्व आणि जैन तत्वज्ञान यांचा विचार प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

गृहीतके – या पुस्तकातील २० ही कथांमध्ये विशिष्ट नीतीमूल्ये आणि जैन तत्वज्ञान आहेत.

मर्यादा आणि व्याप्ती – या पुस्तकातील सर्वच कथांचा वेगवेगळया दृष्टीतून विचार करणे शक्य आहे. पण येथे विस्तार भयास्तव केवळ त्या कथांमधील नीतीमूल्ये आणि जैन तत्त्वज्ञान यावरच लक्ष केंद्रित केले आहे.

संशोधन पद्धती – प्रस्तुत शोध निबंधासाठी विवेचनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

प्राकृतकथा – संस्कृताविष्कार या पुस्तकाचा संक्षिप्त परिचय

'प्राकृतकथा संस्कृताविष्कार' या २०२० साली अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेत कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक यांनी नागपुर येथे प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचे मूळ लेखिका डॉ. राजश्री मोहाडीकर त्यांच्या निवडक २० कथांचा चे संस्कृतात आविष्कार करण्याचे काम प्रा.डॉ.कांचन मांडे यांनी केले आहेत. म्हणून या पुस्तकाचे शीर्षक **'प्राकृतकथा संस्कृताविष्कार'** हे ठेवण्यात आले. या पुस्तकाचे प्रधान संपादक आचार्य श्रीनिवास वरखेडी कुलगुरू, क.का.सं.वि. रामटेक, संपादक आचार्य मधुसूदन पेन्ना महोदय आहेत.

या पुस्तकात डॉ.मोहाडीकर यांनी प्रस्तावनेत सांगितले आहे की, प्राकृत भाषा ही संस्कृतची एक शाखा आहे परंतु प्राकृतभाषेची स्वतःची वैशिष्ट्य आहेत, त्याचमुळे प्राकृत भाषा ही स्वतंत्र भाषा, स्वतंत्र संस्कृती, आणि तत्त्वज्ञान म्हणून स्थापित झाली आहे.[2] तसेच जैन विचारांचा शोध घेण्यासाठी प्राकृत भाषा अभ्यासिली जाते. जैन परंपरा, संस्कृती आणि तत्त्वज्ञान प्राकृत भाषेच्या मदतीने बहरले आहे. आध्यात्मिक जीवन प्राप्त करण्यासाठी आचार नियमाचे पालन केले पाहिजे. प्राकृतात अनेक लघुकथा रचण्यात आल्या आहेत. त्यांच्या माध्यमातून नीती तत्व आणि तत्त्वज्ञान सुगम पद्धतीने सांगितले आहे त्यापैकी डॉ. राजश्री मोहाडीकर या एक आहेत. त्यांनी अनेक 'प्राकृत कथा' लिहीले आहेत.

डॉ. राजश्री मोहाडीकर या सुप्रसिद्ध प्राकृत कथा लेखिका आहेत. पुणे येथील संस्कृत विदुषी आहेत यांचा शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवास अत्यंत उल्लेखनीय आहे. एम.ए., एम.फिल. (संस्कृत) , एम.ए., जेआरएफ-नेट, पीएच.डी. (प्राकृत)

प्रकाशित शोधप्रबंधः जैन प्राकृत स्तोत्रांचा समीक्षात्मक अभ्यास

एम.ए. (पाली) पुणे विद्यापीठात सहायक प्राध्यापक म्हणून कार्य (1996 ते 2019).

डॉ.राजश्री मोहाडीकर यांच्या योगदानामुळे प्राकृत, पाली, आणि संस्कृत या विषयांना देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष ओळख प्राप्त झाली आहे. यांच्या काही प्राकृत कथांचा संस्कृत अनुवाद डॉ. कांचन मांडे यांनी केला आहे.

डॉ . कांचन मांडे

एम. ए., पी. एच. डी. संस्कृत विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (निवृत्त)

डॉ. कांचन मांडे या संस्कृत भाषेतील एक ज्येष्ठ व प्रख्यात विदुषी आहेत. त्यांनी आपले आयुष्य शिक्षण, संशोधन, आणि संस्कृत साहित्याच्या प्रचार व प्रसारासाठी वाहिले आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे संस्कृत विषयात अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली आहे. डॉ. कांचन मांडे यांना त्यांच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी अनेक पुरस्कार व सन्मान मिळाले आहेत. त्या संस्कृत भाषेच्या प्रगतीसाठी झटणाऱ्या एक आदर्श शिक्षिका व संशोधक म्हणून ओळखल्या जातात. यांनी केलेले अनुवादाचे कार्य अत्यंत मौलिक आहे.

मी अभ्यासाकरिता निवडलेल्या प्राकृतकथा संस्कृताविष्कार या ग्रंथामध्ये एकूण वीस कथा आहेत. या सर्वच कथा अतिशय मनोरंजक आणि बोधप्रद आहेत. या सर्वच कथा आकाराने लघु आहेत, सर्वच कथांची भाषा अतिशय साधी,सरळ आणि सोपी आहे. कोणत्याही कथेत दीर्घ समासांचा उपयोग केलेला नाही. पाल्हारीक वर्णन कोणत्याही कथेत नाही. हे सर्व कथांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या सर्वच कथांमध्ये अत्यंत मौलिक अशी नीतीतत्वे आणि जैन तत्वज्ञान लेखिकेने याठिकाणी प्रतिबिंबित केले आहेत.

या कथांमधील नीतीमूल्ये आणि जैन तत्वज्ञान

पहिली कथा **' जिव्हायाम् अमृतं विषम् च l '** ही आहे. जैन तत्वज्ञानात मधुर भाषण याला महत्त्व दिले आहेत, या कथेत वृद्ध स्त्री आलेल्या पथिकाला त्याच्या कटू बोलण्यामुळे अर्ध पक्व भोजन देते. केवळ वाणीचा योग्य उपयोग न केल्यामुळे तो चांगल्या भोजनापासून वंचित झाला. म्हणून म्हणतात_ “**एवं जिह्वायाम् अमृतं विषं च वसति । विषमय्या तया सर्वत्र वयम् अवमाननीया भवेम।**“[3]

दुसऱ्या कथेमध्ये एखाद्या गोष्टीचा अर्थ चातुर्याने लावला असता तो कसा स्पष्ट होतो हे इथे सांगितले आहे. दुसरी कथा म्हणजे **' मन्त्री पुत्रायाः चातुर्यम् '** एखाद्या गोष्टीचा अर्थ चातुर्याने ने लावला असता तो तसा स्पष्ट होतो ते इथे सांगितले आहे. ' स्याद् ' या शब्दाचे वेगवेगळे अर्थ देऊन चंद्रकांता नावाची मंत्राची पुत्री याचा अर्थ स्पष्ट करते. जैन तत्वज्ञानातील स्यादवाद् प्रसिद्ध आहे. स्याद्वादमञ्जरी या ग्रंथात, **एकान्तेनैकमेवैतत् नैव तत्त्वं व्यवस्थितम्।**

अनेकान्तात्मकं तत्त्वं स्याद्वादेन प्रबोध्यते॥[4]

हा श्लोक स्याद्वाद सिद्धांताचा तात्त्विक आधार स्पष्ट करतो.

तिसरी कथा **पंचशालिकणानां शक्तिः** | या कथेमध्ये चातुर्य आणि प्रयत्नवाद या दोन्हीचे महत्त्व सांगितले आहे. एखाद्या गोष्टीचा निट विचार करून निर्णय घेतला तर ते काम कसे यशस्वी होते हे त्या व्यापाऱ्याच्या धाकट्या सुनेच्या उदाहरणावरून या ठिकाणी स्पष्ट केले आहे.

अल्पस्यापि महत्त्वं स्यात् यथायोग्येन योजितम्।

अविवेकाद् विनश्येत् बह्वप्यर्थसमन्वितम्॥[5] हे वचन प्रस्तुत कथा वाचल्यानंतर यथार्थ वाटते.

पुढची कथा ही **'कपिलमुनीचरीतम्'** ही आहे. या कथेमध्ये आध्यात्मिक जीवनाचे महत्त्व सांगितले आहे. आध्यात्मिक चिंतन करणारी व्यक्ती जीवनात यशस्वी होते असे कपिलमुनी यांच्या उदाहरणावरून सांगितले आहे. आणि त्यांनाच उद्देशून म्हटले आहे_

यथा लाभस्तया लोभो लाभाल्लोभः प्रवर्धते ।

द्विमाषयाचिना कर्म शतकोट्या न सिध्यति ।।[6]

यानंतरची कथा ही **'सद्दलपुत्र'** ची आहे. या कथेत भगवान महावीरांनी मातीच्या भांड्याचे उदाहरण देऊन सद्दल पुत्राला त्याचे तत्त्वज्ञान सांगितले आहे.

सहाव्या **'सत्यसृष्टी'** कथेत सत्याचे महत्व सांगितले आहे. सत्यवादी लोकांना खरोखरच मान मिळतो आणि त्यांच्या वागणुकीने पुढील जन्मात ते निश्चितच निर्वाण प्राप्त करतात ,जो व्यापारी सत्यासाठी आपल्या भावाचा साथ सोडून देतो त्याच्यासाठी खरंच असे म्हटले आहे_ **'अहो, अधुनाऽपि एतादृशाः सत्यवादिनः, ये नश्यति स्वभ्रातरि नियमात् सत्यात् न च्यवन्ति।**[7]

सातवी कथा **'इभ्यपुत्रकथानकम्'** ही आहे. या कथेत दान महात्म्य आणि दूरदृष्टी यांचे महत्त्व सांगितले आहेत.

पुढील कथा **'नमी राजा'** ही आहे. वस्तुस्थिती माहीत नसताना कुठल्याही गोष्टीच्या शेवट करू नये ,असे केल्यास कधी कधी आपण आपल्याच माणसाला दुखवू शकतो हे या कथेतून समजून येते.

नववी कथाही **'यथास्थितप्ररुपणेकालककथा'** ही आहे. भगवंताने ठरवलेल्या गोष्टी कोणी टाळू शकत नाही, मृत्यू हा अटळ आहे हे दत्त नावाच्या नायकाच्या उदाहरणावरून या कथेत स्पष्ट केले आहे.

पुढील कथा ही **'भोजनातीरेक'** आहे. कुठलीही गोष्ट गरजेपेक्षा जास्त असली की ती वीष बनते, अती भोजनाचे दुष्परिणाम या कथेत स्पष्ट केले आहे. त्या ब्राम्हणाने दक्षिणेच्या लोभामुळे (अति लोभ) आणि वारंवार जेवण्याच्या अतिरेकामुळे (अतिभोजन) त्याने आधीचे अन्न उलटून पुन्हा पुन्हा जेवायला सुरुवात केली. **'पूर्वभुक्तभोजनं वमित्वा पुनः भुञ्जानः'**[8] याच घटनेतून सिद्ध होते की गरजेपेक्षा अधिक भोजन (अति) केल्यामुळे तो ब्राह्मण कुष्ठरोगी झाला, म्हणूनच **'अति सर्वत्र वर्जयेत्'** हे नीतीतत्त्व या कथेत प्रत्यक्ष दाखवले आहे.

बारावी कथा **'आत्मदमने सिद्धककथा'** ही आहे. या कथेत सर्व मनासारखं होण्याकरिता संयम हे सर्वात मोठे औषध असते हे सिद्धाच्या उदाहरणावरून स्पष्ट होते.

पुढची कथा **'भावानुरूपफळ सांबपालककथा'** ही आहे. ही कथा आपल्या कृतींमागील शुद्ध आणि निस्वार्थ भावनेचे महत्त्व अधोरेखित करते. ही कथा दर्शवते की बाह्य कृतींपेक्षा अंतकरणातील निष्ठा आणि समर्पण अधिक श्रेष्ठ आहे. या कथेत सांब आणि पालक या दोघांचीही कृती सारखी असली तरी शुद्ध आणि अशुद्ध भावनेने केलेली कृती दर्शविलेली आहे दोघांची कृती (वंदन) सारखी असली तरी , साम्बाला शुद्ध भावामुळे श्रेष्ठ फळ (वरदान) मिळाले, पालकाला लोभामुळे तसे फळ मिळाले नाही "कर्म एकच असले तरी भाव चांगला असेल तरच चांगले फळ मिळते." ही कथा प्रत्येक वाचकास हे शिकवते की **"क्रियायाः महत्त्वं अस्ति, परंतु तस्याः पश्चात् स्थितः भावः अत्याधिकं मूल्यवान् ।"**[9]

यानंतर ची कथा **'छलद्रव्ये वंचकवणिककथा'** ही आहे. कोणाचीही फसवणूक करू नये हे नीतिमूल्य यात सांगितले आहेत.

पंधराव्या **'दाने वृद्धदंपतीकथा'** या कथेत आर्थिक व्यवहारात कोणाचीही फसवणूक करू नये यावरून दुसऱ्यांना फसविल्यास मृत्यू समय क्लेश सहन करावा लागतो हे समजते. कथेत सांगितलेला उपदेश अगदी योग्यच आहे, **'दृष्ट्वा स्थविरदृष्टान्तं सद्भावं परिवर्धयेत्। वचनानुगुणं देयं वञ्चना माऽस्तु कुत्रचित् II'**[10]

यानंतरची कथा **'युधिष्ठिरभीमसेनकथा'** ही आहे. आकस्मितपणे केव्हाही मृत्यू होऊ शकतो म्हणून जेव्हा चे काम तेव्हाच करावे हे या कथेवरून स्पष्ट होते. या कथेत युधिष्ठिर महाराजांनी ब्राह्मणाला – **'श्वः दास्यामि'** (उद्या देईन) असे सांगितले. तेव्हा भीमसेन म्हणतो, **"यदा भवान् 'श्वः दास्यामि' इति उक्तवान्, तदा एव ज्ञातं यत् भवान् कालं जितवान्"**[11] म्हणजेच, उद्या देईन असे म्हणणे म्हणजे आपण उद्यापर्यंत जिवंत राहू याची खात्री असल्यासारखे आहे, म्हणजेच काळालाच जिंकले आहे असे समजणे , जे अशक्य आहे.

पुढील कथा ' **गेहेशुरसुवर्णकारककथा** ' ही आहे. या कथेत खोट्या शौर्याचा आणि आत्मविश्वासाचा दिखावा संकटात टिकत नाही आणि म्हणूनच म्हटले आहे_

कथां सुवर्णकारस्य श्रुत्वा लोकाः विवेकिनः ।
वदेयुः कर्म कुर्युश्च यथाविद्यं यथाबलम् ।।[12]

अठराव्या '**असारविषयेनागदत्त श्रेष्ठीकथा**' या कथेत ज्ञानाचे महत्त्व सांगितले आहे अज्ञानी माणसाला चांगले आणि वाईट यातला फरक करता येत नाही हे यात स्पष्ट केले आहेत. जग नश्वर आहे हे जाणून नागदत्तश्रेष्ठीने भोगत्याग करून संयम व वैराग्य स्वीकारले.

नागदत्तकथां श्रुत्वा भवरूपप्रदर्शिनीम् ।
कामभोगादिकांस्त्यक्त्वा वृणीष्व संयमं वरम् ।।[13]

असा उपदेश या कथेच्या शेवटी केला आहे.

एकोंविसावी कथा ' **पुत्रपराभूतपितृकथा** ' ही आहे. या कथेत धनाचे महत्त्व सांगितले आहे. ही कथा एक वैश्विक सत्य सांगते. तुमच्याकडे पैसा असेल तर समाज तुमचा सन्मान करेल अन्यथा नाही. खालील सुभाषित या कथेला तंतोतंत लागू पडते.

धनहीनः न शोभेत, पुत्रहीनो न शोभते।

मूल्यहीनस्तु पुरुषः सर्वथा न प्रकाशते।।[14]

पुढील आणि शेवटची कथाही '**कृपणश्रेष्ठीकथा**' आहे. सुखात अनेकजण साथ देतात, पण दुःखात फारच कमी जण मदतीसाठी पुढे येतात. त्यामुळे खऱ्या मित्राची ओळख संकटाच्या काळात होते. कोणती वेळ कोणावर कशी येणार हे सांगता येत नाही आणि म्हणूनच म्हटले जाते _

कृपणश्रेष्ठिनो न्यायं सद्भावेन विवर्जितम् ।

ज्ञात्वा अनाथदीनेषु कुर्वीत सर्वदा दयाम् ।।[15]

उपसंहार

अशाप्रकारे प्राकृत कथा संस्कृताविष्कार या अनुवादित संस्कृत कथा संग्रहात मधुर बोलण्याचे महत्व,चातुर्य , तत्त्वज्ञानाची जीवनात आवश्यकता, अध्यात्माचे महत्व, सत्य बोलणे, योग्य ज्ञान आणि दूरदृष्टी चे महत्व, वेळेचे महत्व, गरजेपेक्षा जास्त असलेल्या गोष्टीचे दुष्परिणाम, जीवनात संयम असणे, निष्ठा आणि समर्पण अधिक श्रेष्ठ आहे, फसवणूक न करणे, खोटा आत्मविश्वास संकटात टिकत नाही, ज्ञानाचे महत्त्व, धनाचे महत्त्व, खऱ्या मैत्रीची ओळख इत्यादी जीवनमूल्य आणि नैतिक मूल्य प्राकृतकथासंस्कृताविष्कार या ग्रंथात प्रतिपादित केलेली आहेत. ती सर्वच मूल्य केवळ जैन धर्माच्या दृष्टीनेच नव्हे तर सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाची आहेत. जैन जीवन प्रणालीत या सर्व नैतिक मूल्यांचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहेत. या सर्व नीती मूल्यांचे पालन केल्यास जीवन सफल होते असे मानले जाते. जैनांचे जीवन विषयक तत्त्वज्ञान या सर्व कथांमध्ये डॉ. मोहाडीकर यांनी स्पष्ट केलेले

आहेत. या सर्व बोधप्रद कथा संस्कृतात अनुवाद करून डॉ. कांचन मांडे यांनी ते विचार आणि तत्त्वज्ञान संस्कृतच्या वाचकांपर्यंत पोचविले त्यामुळे हे अनुवादित पुस्तक अत्यंत महत्त्वाचे ठरते.

संदर्भसूची

1. संस्कृत साहित्याचा सोपपत्तीक इतिहास - पृष्ठ क्रमांक [२४]
2. प्राकृतकथा–संस्कृताविष्कार - पृष्ठ क्रमांक [२०]
3. प्राकृतकथा–संस्कृताविष्कार [३७]
4. समन्तभद्राचार्य, आप्तमीमांसा, - श्लोक [१०८]
5. सुभाषितसंग्रह - नीतिसारपरंपरा) - पृष्ठ क्रमांक[७०]
6. प्राकृतकथा–संस्कृताविष्कार [४८]
7. प्राकृतकथा-संस्कृताविष्कार: - पृष्ठ क्रमांक [८२]
8. प्राकृतकथा–संस्कृताविष्कार [१०२]
9. प्राकृतकथा–संस्कृताविष्कार [७६]
10. प्राकृतकथा-संस्कृताविष्कार:- पृष्ठ क्रमांक ११3
11. प्राकृतकथा–संस्कृताविष्कार [९१]
12. सुभाषितरत्नभाण्डागार, नीति-प्रकरण
13. प्राकृतकथा–संस्कृताविष्कार [९४]
14. प्राकृतकथा–संस्कृताविष्कार [१२२]
15. प्राकृतकथा–संस्कृताविष्कार [१२२]

संदर्भ ग्रंथ सूची

1. कांचन मांडे,राजश्री मोहाडीकर (२०२०)- प्राकृतकथा–संस्कृताविष्कार-क.का.सं.वि. रामटेक.
2. वि.वा.करंबळेकर (१९६३) - संस्कृत साहित्याचा सोपपत्तीक इतिहास-शारदा प्रकाशन.
3. डॉ.नंदा जयंत पुरी (२००८) - संस्कृत साहित्यातील लघुकथा- क.का.सं.वि. रामटेक.
4. सुभाषितरत्नभाण्डागार,

***

महानुभाव संप्रदायातील पूजावसराचे अनुवादित रूप

अनुज मंचावार
बी. ए. शास्त्री (साहित्य) तृतीय वर्ष

प्रस्तावना :-

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या भूमीला अनेक संत आणि संप्रदायाचा वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्रात असलेल्या अनेक धर्म संप्रदायांपैकी महत्त्वाचा असलेला एक संप्रदाय म्हणजे महानुभाव संप्रदाय. मराठी साहित्य समृद्ध करण्यात या संप्रदायाचा सिंहाचा वाटा आहे हे आपण सगळे जाणतोच. पण या संप्रदायाचे साहित्य हे फक्त मराठीतच नसून इतरही भाषांमध्ये त्याचा अनुवाद झालेला आपल्याला दिसून येते. अनुवादाची ही परंपरा महानुभावियांनी अगदी सुरुवातीपासून जपली आहे. आपण संस्कृत मधून मराठी भाषेत अनुवादित झालेले ग्रंथ बरेच बघितले आहेत पण मराठी भाषेतून संस्कृत भाषेत ही अनुवाद परंपरा महानुभावियांनी सुरू केली. महानुभावांचे अनेक ग्रंथ हे मूळ मराठी भाषेत लिहिल्या गेले आणि पुढे त्याच कवीकडू किव्वा दुसऱ्या कवीकडून तोच ग्रंथ संस्कृत भाषेत अनुवादित करण्यात आला. असे अनेक ग्रंथ आपल्याला पाहायला मिळतील. त्यातीलच एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे रत्नमालास्तोत्र होय. पंडित म्हाइंभट्टांनी लिहिलेला आणि मराठीभाषेतील पहिला चरित्र ग्रंथ आणि गद्य ग्रंथ म्हणून ओळखला जाणारा लीळाचरित्र याचाच संस्कृत भाषेत अनुवादित झालेला पण पद्य स्वरूपात असलेला ग्रंथ म्हणजे रत्नमालास्तोत्र होय. या वरुन आपल्याला हे लक्षात येईल की महानुभाव पंथाची धर्मभाषा जरी मराठी असली तरी त्यांनी इतर भाषांनाही आणि त्यातल्या त्यात देववाणी असलेल्या संस्कृत भाषेलाही तितकच महत्व दिलं. तसेच महानुभावियांना मराठी भाषे इतकच संस्कृत भाषेचही ज्ञान चांगल्या प्रकारे होत. यात महानुभावियांचे पांडित्य लक्षात येते.

आज आपण अशाच एका विषयावर विचार करणार आहोत. तो विषय म्हणजे महानुभाव पंथातील पूजावसर. महाराष्ट्रात अनेक धर्म संप्रदाय आहेत. प्रत्येक संप्रदायाची पूजा पद्धती ही वेगळी आहे. महानुभाव पंथामध्ये पूजावसर हे एक स्तोत्र आहे, ज्यात श्री चक्रधर स्वामींच्या दिनचर्येचे वर्णन येते. हे वर्णन पद्यात्मक आहे, म्हणून आपण याला स्तोत्र म्हणू शकतो. ज्याप्रमाणे वारकरी संप्रदायात हरिपाठाचे पारायण केल्या जाते, त्याच प्रमाणे महानुभाव पंथात सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी या पूजावसराचे पारायण केल्या जाते.

महानुभाव पंथाचे द्वितीय आचार्य बाइदेव व्यास यांनी स्वामींच्या त्रिकाल पूजावसराचे केलेले मराठी भाषेतिल वर्णन हा सर्वप्रथम पूजावसर आहे. त्याला अनुलक्षून पंथात पुढे वेग वेगळ्या साहित्यकारांनी गद्य, पद्य पूजावसरांची रचना केलेली आहे. परंतु प्रत्येक रचनेत बाइदेवबासांच्या पूजावसरांचे प्रतिबिंब आढळते.

ज्याप्रमाणे मराठी मध्ये पूजावसर रचना निर्माण झाल्या त्याच प्रमाणे संस्कृतमध्ये देखील पूजावसर रचना झालेल्या आहेत. त्यातील सर्व प्रथम संस्कृत पूजावसर रचना हि भास्करभट्ट बोरीकरांची आहे. या प्रकरणात भास्करभट्ट बोरीकर कृत संस्कृत पूजावसराचा आपण अभ्यास करू.

उद्दिष्टे :-

या शोधनिबंधाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे -

* मराठी आणि संस्कृत पूजावसरांच्या रचनेतील साम्ये आणि फरक शोधणे.
* पूजावसराचे भाषिक आणि साहित्यिक वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.
* महानुभाव पंथातील मराठीतून संस्कृतमध्ये झालेल्या अनुवाद परंपरेचा अभ्यास करणे.ये
* मराठी आणि संस्कृत भाषांमधील परस्परसंबंधांचे विश्लेषण करणे.
* महानुभाव पंथातील अनुवाद परंपरेचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.
* महानुभव साहित्यातील भाषांतराचे स्वरूप आणि तंत्रांचा अभ्यास करणे.
* भाषांतर शास्त्रातील सिद्धांतांच्या आधारे महानुभाव साहित्यातील भाषांतराचे विश्लेषण करणे,
* भाषांतर शास्त्राच्या विकासात महानुभाव साहित्याचे योगदान स्पष्ट करणे.

पूजावसर विधीचा प्रारंभ :-

लिळाचरित्राचे अध्ययन केले असता असे दिसून येते की भक्त बाईसा या स्वामींची दिवसातून तीन वेळा मोठ्या स्वरूपात पूजा करीत असत. व त्याप्रसंगी स्वामींचे भक्त व गावातील महाजनही उपस्थित राहत असत. लिळाचरित्रातिल या वर्णनाला अनुलक्षून बाइदेव बासांनी पूजावसर या रचनेचीनिर्मिती केलेली आहे त्यात प्रातः पूजावसर, मध्यान्ह पूजावसर, सायंकालीन पूजावसर असे तीन पूजेचे प्रसंग एकत्रीत वर्णन केलेले आहे.

पूजावसर शब्दाचा अर्थ :-

"पूजायाः अवसरः इति पूजावसरः"" पूज् पूजायाम् इति धाती' या धातुमध्ये चुरादि गणिय उभयपदी धातु आहे. पूजयति, पूजयते. पूज् आराधना करणे, पूजा करणे, अर्चना करणे, सम्मान करणे, सादर स्वागत करणे, पूज धातुचे इत्यादी अर्थ आहेत. पूजावसर म्हणजे पूजेचा वेळ किंवा पूजेचा प्रसंग.

पूजावसराचे प्रकार :-

पूजावसर विविध प्रकारचे असतात. परंतु मुख्य पूजावसरांचे तीन प्रकार आहेत.

१) प्रातःकाळ पूजावसर

२) मध्यान्हकाळ पूजावसर

३) सार्यकाल पूजावसर

या तिन्ही पूजावसरांच्या व्यतिरीक्त आणखीही पूजावसर आहेत. एकूण बारा प्रकारचे पूजावसर परंपरेत मानल्या जातात. परंरतु बारा प्रकारच्या पूजावसरापैकी मूख्य तीन प्रकारचे पूजावसर या तीन पूजावसरांच्या अंतर्गतच इतर पूजावसर येतात. म्हणून या तिन्ही पूजावसराचे महत्व पुढीलप्रमाणे थोडक्यात सांगत आहे.

पंडित श्री भास्करभट्ट बोरीकर कृत मराठी व संस्कृत पूजावसर :-

श्री कवीश्वर बासांचे मराठी पूजावसर इ.स. (१३१५) हा डोमेग्राम येथील दिनचर्यात्मक (६०) साठ ओव्यांची रचना प्रातः मध्यान्ह व सायंकालीन पूजावर मध्यवर्ती ठेवून (२०) वीस ओव्यातील ही रचना आहे. रचनेची भाषा प्रासादिक आणि माधुर्य युक्त आहे, कल्पक गुण वैशिष्टयपूर्ण सामान्य जनांना समजेल अशा या मराठी ओवीरुप पूजावसर रचनेचे स्वरुप जन संवादी आहे.

दोन्ही पूजावसराची वैशिष्टये :-

भास्करभट्ट बोरीकरांच्या स्तोत्राचे वैशिष्टये वस्तुतः सामान्य लोकांना समजेल अशा प्रकारच्या त्यांच्या रचना आहे. संस्कृतचे प्रकांड विद्वांन असून पूजावसराचे स्वरुप एक प्रासादिक आणि माधुर्य युक्त भाषा वापरलेली आहे. त्याचप्रमाणे संस्कृतच्या त्रिकाळ पूजावसरात २७ श्लोकाच्या अंतर्गत त्यांनी स्वामींच्या दिनचर्येचे महत्वाचे प्रसंग देवून पूजावसराला एक सुंदर स्वरुप दिलेले आहे. त्याचप्रमाणे मराठी पूजावसरात ६० ओव्या मध्ये प्रातः, मध्यान्ह आणि सायंकालिन पूजावसरात संस्कृत पूजावसरापेक्षा यात विशेष वर्णन आहे. दुसरे संस्कृत पूजावसर स्तोत्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची अलंकारिक भाषा अतिशय प्रशंसनीय आहे.

पूजावसर स्तोत्राचा अनुवाद :-

भास्करभट्ट बोरीकरांनी स्वामींच्या त्रिकाळ संस्कृत पूजावसरात विविध अलंकारांनी प्रस्तुतीकरण दिलेले आहे. पूजावसराची भाषा सुबोध गम्य असून अलंकारांनी अलंकृत असलेली अतिशय शोभून दिसते. स्वामींच्या श्रीमूर्तिचे वर्णन रुपक आदि अलंकारांनी पांडित्य पूर्ण वर्णन केलेले आहे. कविची कवित्व प्रतिभा बेजोड असल्यामुळे त्यांना प्रत्येक रचनेत अतिशय यश मिळालेले आहे. मराठी पुजावसराचा त्यांनी केलेल संस्कृत अनुवाद अत्यंत सुंदर आहे.

प्रातःकाल पूजावसर संकल्पना :-

प्रातःकालिन पूजावसरामध्ये प्रातःकालचे महत्व सांगत असतांना स्वामी म्हणतात "पश्चात प्रहरी उठीजे तो सारस्वत काळ देवता हृदयासी ये" म्हणजे पश्चात प्रहराचा वेळ परमेश्वराच्या संपूर्ण जीवांचे चिंतन करायचा असतो त्यावेळेस प्रत्येक जीवांनी परमेश्वराचे चिंतन केले पाहिजे, परमेश्वराच्या चिंतनात आपणही उपस्थित व्हावे जेणेकरुन परमेश्वराचे चिंतन आणि त्यांची कृपादृष्टी आमच्यावर राहावी हेच महत्वाचे उपदेश आहे.

अ.क्र	मराठी पूजावसर (ओवी)	अनुवादित संस्कृत पूजावसर	अर्थ
१.	तवं सूर्यादयी दंतपक्ती : सिळीका चोखाळीती : वक्र सिळीका करुनी फेडीती : जिव्हामळु ॥१४॥	सूर्योदये दशनशोधनां विधाय। जिह्वामलं शिलकया कृतवकया सः। मन्द मुमोच जगतां जनकः कराभ्याम्। श्रीमान पारमरूणाकर चक्रपाणीः ॥५॥	सूर्योदय झाल्यानंतर स्वामी दंत धावन करीत असत आणि आणलेल्या दोन दातुनापैकी एका दातुनला मध्यभागी दोन फाड करुन धनुष्य आकार करुन जिव्हेचे मळ हळूच स्वच्छ करीत असत.
२.	जेही ईश्वर चिन्हें सेवीली : बाईसी चरण कमळे प्रक्षाळीली : पावले परिमार्जुनी ठेवीली आसनवारी ॥१६॥	नागाम्बिका कमलकोमलमासनं सा। दीपप्रकाशमकरोत् सलिलञ्चसोष्णम्। शौचं चकार सुयशस्पयसाथ तेन। नार्गार्जुनेन सह चक्रधरः प्रयातः ॥३॥	तेव्हा इकडे नागुबाईसा स्वामींसाठी आसन टाकून दिवा लावत आणि स्वामींसाठी गरम पाणी हात पाय सोवळे करण्यासाठी ठेऊन स्वामी तिकडून आल्यावर उष्णोदकाचे विनियोग करीत असत.
३.	बाईसीभरीलीया रंगमाळीका : लल्लाटी टीळा नेटका : निजरुप त्रिरेखा : द्योतवीत असे ॥१८॥	गण्डूष मूर्जितवराधरदन्तपक्तिः। सुस्नातमायतसुखायतनं चकार ।। सौन्दर्यवर्यवदना सदनाशयश्री । श्रियः पतिः सुमनसा पयसाथतेन ॥६॥	नंतर दंतपंक्ति स्वच्छ करुन स्नान होवून आसनस्त होत होते. श्रीचक्रधर श्रीमुख आणि श्रीचरण कमळ प्रक्षाळून आसनस्त झाल्यावर नागुबाईसा

			स्वामींच्या भाळस्थळावर उर्ध्व पौंड्र टीळा लावीत असत.
४.	तीये श्रीकंठी माळा : बाईसी घातलीया सुपरिमळा : स्वामी अर्चुनी आंध्रयुगळा : मंगळारती केली ॥१९॥	कण्ठे लसपरीमलालयपुष्पमाला। निरांजनं चवरदीपपरम्पराभिः ॥ धूपं तदोष्ठपुटमण्डनचारुरुपम्। जिह्वाग्रविटकमथस्फुटिताम्बुजाक्षः ॥८॥	श्रीकंठी पुष्पमाळा, सुवासिक पुष्पमाळा घालून धुप, दीप, आरती ओवाळून त्यांना विडा देत असत. जेणे करुन त्यांचे श्रीमुख अतिशय सुंदर दिसत असत.

मराठी आणि संस्कृत पूजावसरांच्या रचनेतील साम्य :-

चारही उदाहरणांमध्ये दोन्ही भाषांतील श्लोकांचा मूळ अर्थ समान आहे तसेच चारही उदाहरणांमध्ये चक्रधरांच्या दिनचर्येचे वर्णन बऱ्याच ठिकाणी मराठी आणि संस्कृत भाषेत एका अर्थाचे दोन समान शब्द पहायला मिळतात उदा सूर्योदय, जिव्हामळ कण्ठ इत्यादि.

मराठी आणि संस्कृत पूजावसरांच्या रचनेतील फरक :-

मराठी पदय सोप्या आणि सरळ भाषेत आहेए तर संस्कृत श्लोक अधिक अलंकारिक आणि काव्यमय आहे. संस्कृत श्लोकात अधिक क्लिष्ट शब्दरचना आणि समासांचा वापर केला आहे तर मराठी श्लोकात सोपी शब्दरचना आहे. मराठी पदय हे ओवी स्वरूपात असून संस्कृत पदय हे श्लोकबध्द आहे.

पूजावसराचे भाषिक आणि साहित्यिक वैशिष्ट्ये :-

पूजावसर स्तोत्राची वर्णन शैली अतिशय सुंदर अलंकारीक, बोधगम्य, हृदयवेधक आणि प्रासादिक आहे. असे असून ही रचना विद्वतापूर्ण; चातुर्यपूर्ण आणि पांडित्यपूर्ण आहे, कविचे संस्कृत आणि मराठी भाषेवर विशेष प्रभुत्व, वर्ण्य विषयाचे सांगोपांग ज्ञान, चित्र शैली, अलंकारिक कल्पना विलास, तल्लीन संवेदन शिलता व नितळ शब्दकळा असल्यामुळे पूर्ण वर्णन निवेदन प्रतितिक्षाव आलेले आहे अशी त्यांची वर्णन शैली त्यांनी आपल्या अप्रतिम नैपुण्याने (कुशलतेने) भाषेला चांगले स्वरुप दिलेले आहे. शब्दालंकार आणि अर्थ अलंकारांनी भाषेला खूप सजविलेले आहे. वर्णनाच्या ओघात वाहून जात असता या सर्व अलंकारांची कविने नुसती तफावत उडून दिली आहे. भाषेचे श्रृंगारिक वर्णन कविची एक अप्रतिम कला आहे.. त्याचप्रमाणे उपमा अलंकार, उत्प्रेक्षा, रुपक, दृष्टांत

श्लेष, अनुप्रास, यमक, अर्थान्तरन्यासः इत्यादी अलंकारांनी कविने आपल्या भाषेला असे श्रृंगारिक रुप दिलेले आहे त्यांच्या साहित्यकृती मध्ये अनेकविध रस आणि गुणांचा समावेश आहे.

अनुवादित संस्कृत पूजावसरामध्ये अलंकारांचे वर्णन :-

अतिशयोक्ति अलंकार

१. सूर्योदये दशनशोधनतां विधाय। जिह्वामलं शिलकया कृतवकया सः ।
मन्द मुमोच जगतां जनकः कराभ्याम्। श्रीमान पारमरूणाकर चक्रपाणीः ॥५॥

या श्लोकात श्रीचक्रधर स्वामी उपमेय असून मायापती, अपार करुणाकर सृष्टिकरता जगत्पिता ईत्यादी भिन्न भिन्न उपमा दिल्यामुळे अतिशयोक्ति अलंकार आढळून येतो.

२. गण्डूष मूर्जितवराधरदन्तपङ्क्तिः। सुस्नातमायतसुखायतनं चकार ॥
सौन्दर्यवर्यवदना सदनाशयश्रीः। श्रियः पतिः सुमनसा पयसाथातेन॥६॥

या श्लोकात श्रीचक्रधर स्वामी उपमेय असून श्रियः पतिः उपमा दिल्यामुळे अतिशयोक्ति अलंकार आढळून येतो.

उत्प्रेक्षा अलंकार

१. नागाम्बिका कमलकोमलमासनं सा। दीपप्रकाशमकरोत् सलिलञ्चसोष्णम् ।

शौचं चकार सुयशस्पयसाथ तेन। नार्गार्जुनेन सह चक्रधरः प्रयातः ॥३॥

या श्लोकात उपमेयाची अर्थात उपमेय कमल असून त्या कमल आसना बरोबर कल्पना केली म्हणून या ठिकाणी उत्प्रेक्षा अलंकार दिसून येतो.

पूजावसर स्तोत्रात आलेले छंद पुढील प्रमाणे आहेत :-

पूजावसर स्तोत्रात एकूण २७ श्लोक आहेत. कविने यात वसंततिलका वृत्ताचा प्रयोग केलेला आहे. यातील संपूर्ण श्लोक वसंततिलका वृत्तातच आहेत. वसंततिलका वृत्तातिल ही रचना शब्दालंकार व अर्थालंकाराणे युक्त असून भाषा माधुर्याचा परिपोष करणारी आहे. विस्ताराने छोटीच पण वाङमय गुणाने ती समृद्ध आहे.

पूजावसर स्तोत्रात आलेले गुणवर्णन :-

भास्करभट्ट बोरीकर विरचित संस्कृत पूजावसर माधुर्य आणि प्रसाद गुणान्वित एक सुंदर रचना आहे. परमेश्वराचे पूजावसर असल्यामुळे यात ओज गुण नाही, फक्त माधुर्य आणि प्रसादच दोन्ही गुण त्रिकाळ पूजावसरात पहावयास मिळतात.

पूजावसर स्तोत्रात रस वर्णन :-

भास्करभट्ट बोरीकर कृत संस्कृत पूजावसरात शृंगार रस, अद्भूत रस आणि शांत रसाचे वर्णन आढळून येते.

निष्कर्ष :-

१ मराठी आणि संस्कृत पूजावसरांच्या रचनेत बरेच साम्ये आढळून येते.

२ पूजावसराचे भाषिक आणि साहित्यिक वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

३ महानुभाव पंथातील मराठीतून संस्कृतमध्ये झालेला हा अनुवाद महानुभाव साहित्याला दिशा देणारा ठरला आहे.

४ महानुभाव पंथातील अनुवाद परंपरा ऐतिहासिक असून तत्कालीन कोणत्याही इतर सम्प्रदायात आशी अनुवाद परंपरा आढळत नाही.

५ महानुभाव पंथातील मराठीतून संस्कृतमध्ये झालेल्या या अनुवादात बऱ्याच ठिकाणी ळ या अक्षराचा उच्चार झाला आहे.

समारोप :-

भास्करभट्टांनी रचना केलेले संस्कृत पूजावसर मुख्य पूजावसराचा यद्यपि आधार घेवूनच पूजावसराची रचना केलेली आहे. तथापी हे पूजावसर अत्यंत संक्षिप्त आणि सुंदर रसादि अलंकारांनी रचलेले आहे. प्रातःकाळ पूजावसरात स्वामींच्या दिनचर्येचे निरोपण करुन प्रातः विधी आटोपून जीवाचे चिंतन करीत होते. ज्या अधिकारी जीवांना मोक्ष प्राप्त करुन दयायचा आहे. त्यांच्या पुढे येणारे अडथळे दूर करुन त्यांना मोक्ष प्राप्तीच्या योग्य केलेले आहे.

त्याचप्रमाणे स्वामींच्या सन्निधानी असलेल्या भक्तिजनांकडून त्यांचा कर्मनाश करुन घेण्यासाठी त्यांच्याकडून अनेकविध सेवा करुन घेत असत. त्रिकाळ पूजावसरात स्वामींच्या दिनचर्येचे वर्णन आलेले आहे हे पूजावसर डोमेग्राम येथील मुख्य पूजावसराच्या संदर्भानुसार पूजावसराची रचना केलेली आहे. वस्तुतः श्रीचक्रधरस्वामी नेहमी परिभ्रमणच करीत होते. त्यामुळे त्यांच्या पूजावसरांमध्ये किंचितसे अंतर येत होते परंतु डोमेग्राम येथील पूजावसराचा आधार घेवूनच सर्व पंडितांनी पूजावसराची रचना केलेली आहे. भास्करभट्ट बोरीकरांनी या तिन्ही पूजावसरामध्ये अतिशय सुंदर अलंकार, रस, छंद, आणि गुणांचे वर्णन केलेले आहे.

संदर्भग्रंथसूची :-

१ महानुभावांचा इतिहास म. मुरलीधर कोळपकरकृत, 'प्रकाशक म. श्री प्रभाकरबाबा संन्यासी महानुभाव, यवतमाळ, तृतीय आवृत्ती २०१०

२ डॉ. श्रीसोनपेठकर महानुभाव, पूजावसर (संपादन) राजयोग प्रकाशन, संवत्सर, प्रथम आवृत्ती २०१६

३ (अप्रकाशित शोधप्रबंध) महाकवी भास्कर भट्ट बोरीकर यांच्या संस्कृत रचणांचे समीक्षणात्मक अध्ययन (साहित्य विभाग क.का.सं.वि. रामटेक) डॉ. गोविंद शिंदे

***

अनुवाद की भूमिका : भारतीय ज्ञान परंपरा के प्रसार मे भारतीय नृत्य के संदर्भ में

अनघा निलदावार
पीएच.डी.स्कौलर, संस्कृत साहित्य विभाग
कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
मार्गदर्शक - **डॉ. प्रो. कविता होले**
संस्कृत साहित्य विभाग

सारांश

भारतीय ज्ञान परंपरा के समृद्धि और उसकी व्यापकता में अनुवाद की भूमिका महत्वपूर्ण है। भारतीय नृत्य, जो भारत की संस्कृति पर आध्यात्मिक अभिव्यक्ति का एक मुख्य माध्यम है, विभिन्न भाषाओं, संस्कृतियों और समय के साथ विकसित हुआ है। साहित्य, दर्शन, कला, संगीत और नृत्य जैसे क्षेत्रों का गहरा योगदान भारतीय संस्कृति को बढ़ाने में रहा है। इन ज्ञान क्षेत्र के प्रसार में अनुवाद एक महत्वपूर्ण भूमिका निभाता है विशेष कर भारतीय नृत्य के संदर्भ में।

भारतीय शास्त्रीय नृत्य केवल एक कला रूप नहीं बल्कि ज्ञान, भक्ति, अध्यात्म और संस्कृति का वाहक भी है। भरतमुनि के "नाट्यशास्त्र", नंदीकेश्वर के "अभिनयदर्पण" और अन्य ग्रंथों में नृत्य की संरचना, भाव–भंगिमा, मुद्रा और रस सिद्धांत का वर्णन किया गया है। इन ग्रंथो के अनुवाद ने भारतीय नृत्य की परंपरा को न केवल देश में बल्कि विश्व स्तर पर फैलाने में मदद की। संस्कृत, प्राकृत, तमिल आदि भाषाओं में उपलब्ध इन ग्रंथो को अंग्रेजी हिंदी और अन्य भाषाओं में अनुवादित करने से विभिन्न संस्कृतियों के लोगों को भारतीय नृत्य के गुण अर्थों को समझने का अवसर मिला।

यह शोध पत्र भारतीय नृत्य शैलियों की विविधता को समझते हुए अनुवाद की भूमिका को रेखांकित करता है, जिससे विभिन्न क्षेत्रों, भाषाओं और संस्कृतियों में भारतीय नृत्य परंपराओं का आदान-प्रदान हुआ और साथ ही भारतीय ज्ञान परंपरा की समृद्धि को भी उजागर करता हैं।

कूट शब्द: – भारतीय ज्ञान परंपरा, भारतीय नृत्य, ग्रंथ, अनुवाद, नाट्यशास्त्र, अभिनयदर्पण

परिचय

भारतीय ज्ञान परंपरा मुख्य रूप से मौखिक, ग्रंथों, कला और प्रदर्शन कलाओं के माध्यम से संरक्षित और प्रसारित हुई है। भारतीय नृत्य एक प्रमुख माध्यम रहा है जिसके द्वारा धार्मिक, दार्शनिक और संस्कृत विचारों को पीढ़ी दर पीढ़ी संचारित किया गया। अनुवाद ने इस ज्ञान के संरक्षण और प्रसार में

महत्वपूर्ण भूमिका निभाई, विशेष रूप से तब जब भारतीय नृत्य परंपराओं ने अन्य भाषाओं और संस्कृतियों के साथ संपर्क स्थापित किया।

भारतीय ज्ञान परंपरा एक समृद्ध और बहुआयामी विरासत है। यह परंपरा न केवल भारत की सीमाओं तक सीमित रही है, बल्कि अनुवाद के माध्यम से विश्व भर में फैली है। अनुवाद ने भारतीय सांस्कृतिक और कलात्मक धरोहर को विभिन्न भाषाओं में प्रस्तुत कर उसे वैश्विक स्तर पर स्वीकार्यता दिलाई है।

भारतीय नृत्य परंपरा जो कि शास्त्रीय और लोक नृत्य के रूप में विकसित हुई है, केवल मनोरंजन का साधन नहीं बल्कि एक आध्यात्मिक और संस्कृति अभिव्यक्ति भी है। कथक, भरतनाट्यम, कुचिपुड़ी, मणिपुरी, ओडीसी, मोहिनीअट्टम और कथकली जैसी शास्त्रीय नृत्य शैलियों मैं गहरे आध्यात्मिक और दार्शनिक अर्थ निहित है। इन नृत्य में भाव, रह, ताल मुद्राओं और कथा वाचन की समृद्धि परंपरा देखी जाती है।

अनुवाद की भूमिका इस संदर्भ में अत्यंत महत्वपूर्ण हो जाती है, क्योंकि यह भारतीय नृत्य के गूढ़ संदेशों, उसकी भाव भंगिमाओ और प्रतीकों को अन्य भाषाओं और संस्कृतियों तक पहुंचाने में सहायक होता है। चाहे वह नृत्य से संबंधित प्राचीन ग्रंथो का अनुवाद हो, प्रदर्शन कल की व्याख्या हो, या भारतीय नृत्य की सौंदर्य शास्त्रीय दृष्टि को अन्य भाषाओं में व्यक्त करने की प्रक्रिया हो, अनुवाद इस सांस्कृतिक प्रसार का एक सशक्त माध्यम बनता है।

भारतीय नृत्य परंपरा और भाषा

